




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १२१ * नांदेड * शुक्रवार, दि. ८ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# नांदेड जिल्ह्यात वादळीवाऱ्यासह गारपीट; अनेक पिकांचे नुकसान

## उकाड्यापासून दिलासा

**नांदेड (प्रतिनिधी)–** हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात गुरूवार, दि. ७ मे रोजी दुपारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने तडाखा दिला. यात काही भागात गारपीट झाली. या अवकाळीत आंबा, डाळींब, केळी या फळ पिकांसह शेतात काढून टाकलेल्या हळद पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तर शहर परिसरासह सिडको, हडको भागात पावसाने नागरिकांना उकाड्यापासून थोडासा दिलासा मिळाला.

नांदेड जिल्ह्यात ७ मे रोजी हवामान खात्याने येलो अलर्ट जारी केला होता. त्यानुसार गुरूवारी सकाळपासूनच वातावरण ढगाळ झाले होते. दुपारी २ वाजेच्या सुमारास शहरासह सिडको भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. त्याचबरोबर कंधार तालुक्यातील नागबर्डी परिसरात जोरदार पाऊस झाला, यात पेठवडज भागात गारपीट झाल्याची माहिती आहे. माहूर तालुक्यातील अनेक ठिकाणी वादळी पाऊस झाला. तर काही भागात आंबा, डाळींब फळांसह हळदीचेही नुकसान झाले.

हिमायतनगर तालुक्यातही जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस झाला आहे. अर्धापूर परिसरातही पाऊस झाला. अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकरी आणि नागरिकांची एकच तारांबळ उडाली. जोराच्या वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्या तर काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. वादळामुळे शेतातील उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून विशेषतः भाजीपाला पिके, मका, ज्वारी तसेच आंबा, डाळींब व फळबागांना फटका बसला आहे. फळझाडांवरील फळे खाली पडल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

जिल्ह्यात सध्या हळद काढणी जोमात सुरू आहे अनेक शेतकऱ्यांनी हळदीचे पीक वाळवण्यासाठी शेतामध्ये टाकले आहे. मात्र गुरूवारी दुपारी झालेल्या अवकाळी पावसामुळे हळद भिजून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

# दहावी परीक्षेचा आज निकाल

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल पुढील अधिकृत संकेतस्थळांवर आज शुक्रवार, दि. ८ मे २०२६ रोजी दुपारी १ वा. ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे.

तसेच https://mahahsscboard.in (in school login) या संकेतस्थळावर शाळांना त्यांच्या शाळांचा एकत्रित निकाल उपलब्ध होईल. ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतः च्या अनिवार्य विषयांपैकी कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://mahahsscboard.in वरून स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

### या संकेतस्थळांवर पाहता येणार निकाल

https://results.digilocker.gov.in
https://mahahsscboard.in
https://sscresult.mkcl.org,
https://results.targetpublications.org
https://results.navneet.com
https://www.tv9marathi.com

# वजिराबाद ठाण्याच्या हद्दीत ग्रामीण पोलिसांची कारवाई; तब्बल ४,७९६ हत्यारं जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या वजिराबाद भागातील बळीरामपूर आणि गुरु रामदासनगर परिसरात नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून बुधवारी रात्री कारवाई केली. यावेळी चक्क ४,७९६ घातक शस्त्र ज्यात तलवार, खंजर, गुप्ती आदी शस्त्रांचा समावेश आहे. राज्यातील ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे पोलिसांनी सांगितले.

यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस ठाण्याला भेट देऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. याप्रकरणी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना अवैध शस्त्रसाठ्याबाबत गुप्त माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे त्यांनी आपल्या पथकासह बुधवारी रात्री शहरातील बळीरामपूर येथील एकाला ताब्यात घेतले. त्याच्या सांगण्यावरून वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अबचलनगर परिसरातील गुरु रामदासनगर छापा टाकला.

छापेमारीदरम्यान मोठ्या तलवारी ३१५, छोट्या तलवारी १३५, काळया रंगाच्या गुप्त्या २५७, पांढऱ्या रंगाच्या गुत्या ८१, काळया पात्याचे खंजर १९८, हिरव्या मुठीचे खंजर २७५, ग्रे कलरचे खंजर ११६, पांढऱ्या रंगाचे खंजर १५३, पिवळे खंजर २४३, इतर छोटे एकत्रित खंजर ४१७, छोट फोल्डिंगचे खंजर २५५०, कुकरी खंजर २८, फोर फिंगर ग्रीप खंजर २८ आणि स्क्रू ड्रायव्हर, पकड, हातोडे, पान्हे इतर साहित्य असे एकूण ४,७९६ शस्त्र जप्त करण्यात आले आहेत. त्यांची किंमत अंदाजे ४३ लाख ४८ हजार रुपये असल्याचे सांगितले.

या प्रकरणी जसवंतसिंघ प्रकाशसिंघ सुखमणी (वय ५० वर्षे, रा. रामदास नगर, अबचलनगर परिसर, नांदेड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडे शस्त्रसाठा कसा आला? तो कुठून विक्रीसाठी आणला होता? तसेच या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का? याचा तपास सुरू आहे. जप्त करण्यात आलेला संपूर्ण शस्त्रसाठा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या आवारात सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

प्राथमिक तपासात हा शस्त्रसाठा कोलंबिया, चीन, अमेरिका तसेच इतर परदेशांतून आणण्यात आल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. राज्यातील अवैध शस्त्र व्यवहारावर मोठा आळा बसण्यास या कारवाईमुळे मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या मोठ्या कारवाईमुळे नांदेड जिल्ह्यात अवैध शस्त्र व्यवहारांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट दिसत असून पुढील तपास ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर करीत आहेत.

# विजयला राज्यपालांकडून सत्तास्थापनेचे निमंत्रण

**चेन्नई (प्रतिनिधी)–** तामिळनाडूच्या सत्तासंघर्षाचा सस्पेन्स अखेर संपुष्टात आला आहे. तामिळगा वेट्री कळघम पक्षाचे प्रमुख आणि सुपरस्टार विजय थलपती यांच्या मुख्यमंत्रीपदावर शिक्कामोर्तब झाले असून गुरुवारी त्यांनी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांची भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केला. राज्यपालांनी विजय यांचे सादरीकरण आणि आमदारांच्या पाठिंब्याबाबत समाधान व्यक्त करत त्यांना अधिकृतपणे सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले आहे.

# बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांना पोलिसांनी लातूरमधून केली अटक

**बीड (प्रतिनिधी)–** बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन आणि मावेजा वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित घोटाळा प्रकरणात अखेर मोठी कारवाई करण्यात आली आहे. बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी लातूरमधून अटक केली आहे. या अटकेच्या वृत्ताला पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी दुजोरा दिला असून या कारवाईमुळे संपूर्ण महसूल विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अविनाश पाठक यांची या प्रकरणावरून दिवसभर कसून चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर विशेष तपास पथकाने (एआयटी) त्यांना लातूरमधील राहत्या घरातून ताब्यात घेतलं. या घोटाळ्याचा तपास एसआयटीच्या माध्यमातून सुरू असून, आता थेट तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांवरच कारवाई झाल्याने हे प्रकरण गंभीर वळणावर पोहोचलं आहे.

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनावेळी शेतकऱ्यांचा मावेजा आणि जमिनीच्या संपादनात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी बीडमधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात यापूर्वीच १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात अविनाश पाठक यांच्या नावाचाही समावेश होता.

# होर्मुझतून ११ भारतीय जहाजे बाहेर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** प्रादेशिक तणावाच्या पार्श्वभूमीवर ११ भारतीय जहाजे हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून यशस्वीरित्या बाहेर पडली आहेत, तर १३ जहाजे अद्याप पर्शियन गल्फमध्ये अडकलेली आहेत. या जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी भारत सरकार इराणच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा करत आहे, अशी माहिती गुरुवारी परराष्ट्र मंत्रालयाने दिली.

# जिल्ह्यात सतत गुन्हे करणाऱ्या १६ गुन्हेगारांची जिल्ह्यातून हकालपट्टी

## एसपी अबिनाश कुमार यांचा आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर आणि जिल्ह्यात वारंवार गुन्हे करून शांतता भंग करणाऱ्या सराईत १६ गुन्हेगारांना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी हद्दपार केले आहे. या कारवाईमुळे अन्य गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहे.

जिल्ह्यातील वारंवार गुन्हे करणारे सराईत गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करून सुध्दा त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी अशा सराईत गुन्हेगारांना हद्दपार करण्यासंबंधाने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन क्रॅकडाऊन नुसार कारवाई सुरु करण्यात आली आहे.


सराईत गुन्हेगारांचे संबंधित पोलीस ठाण्याकडून कलम ५६ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालयास प्राप्त झाले होते. त्यामध्ये सखोल चौकशी करून सदरचे सराईत गुन्हेगार हे वारंवार गुन्हे करण्याचे सवयीचे असल्याने त्यांना हद्दपार करणे आवश्यक असल्यामुळे त्यांच्याविरूध्द पाठविण्यात आलेल्या प्रस्तावात खालील नमुद एकूण १६ सराईत गुन्हेगारांना नांदेड जिल्ह्याच्या बाहेर हद्दपार करण्यात आले आहे.

तसेच सन २०२६ मध्ये कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये एकुण १४ टोळयामधील ३९ इसमांना नांदेड जिल्ह्याच्या बाहेर हद्दपार



करण्यात आले आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील धोकादायक व्यक्तींना स्थानबध्द करण्यासंबंधाने चालू वर्षात २२ प्रस्ताव प्राप्त झाले असून ९ व्यक्तींना एमपीडीए कायदयाअंतर्गत एक वर्षासाठी कारागृहात स्थानबध्द केले आहे.

या कारवाईत शेख शहारूख ऊर्फ कबुतर शेख अजगर रा. खुदबेनगर नांदेड, आशीष अशोक तारू रा. वाघाळा नांदेड, सुशिल मनोहर गावखोरे रा. जयहिंद नगर नांदेड, दत्ता शिवाजी पवार रा. वसरणी नांदेड, विवेक अनिल नवघडे रा. जयभिम नगर नांदेड, जीवन उत्तम शंकपाळ रा. आंबेडकर नगर नांदेड, शुभम ऊर्फ शिवा जालींदर दवणे रा. जयभिम नगर नांदेड, अरबाज ऊर्फ अब्बू आरीफ पठाण रा. गोविंदनगर नांदेड, नितेश ऊर्फ नितीन परमेश्वर इंगळे रा. शिवनगर तरोडा नांदेड, शहारूख ऊर्फ मॅडी सय्यद एजाज रा. चौफाळा नांदेड, किशन राजू कुरील रा. जुना मोंढा नांदेड, शेख अनवर शेख अमर रा. किल्ला रोड इतवारा, नांदेड, रोहन माधव नवघडे रा. देगाव चाळ, नांदेड, सुजल अनिल सदावर्ते रा. देगाव चाळ, नांदेड, मारोती व्यंकटी शेळके रा. लोहा, प्रदीप अरूण टापरे रा. रूई ता. कंधार यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.



# जिल्हाधिकाऱ्यांनी केले महसूल सहायकास निलंबित

**नांदेड (प्रतिनिधी)–** कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी महसूल सहायक माधव हरी फुलवळे यांना शासन सेवेतून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निलंबित केले आहे.

कंधार येथील कु. गजेश्री व्यंकटराव गोरे यांची आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक संवर्गातून जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत कनिष्ठ सहायक या पदावर निवड झाल्यामुळे त्यांच्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS Certificate) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी करुन घेवून त्यांना १० मार्च २०२६ पर्यंत नियुक्ती द्यावयाची होती. संबंधित महसुल सहायक माधव हरी फुलवळे यांनी २३ मार्च २०२६ रोजी मुदत संपल्यावर पडताळणी अहवाल सादर केला. त्यांच्या प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव जिल्हा परिषद नांदेडकडून जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तो पडताळणीसाठी २३ सप्टेंबर २०२५ रोजी कंधार तहसीलदार यांना पाठविण्यात आला होता. या तहसील कार्यालयातील महसुल सहायक माधव हरी फुलवळे यांनी २३ मार्च २०२६ रोजी तो पडताळणी अहवाल सादर केला.

परंतु या उमेदवाराच्या भरती प्रक्रियेची मुदत ही १० मार्च २०२६ रोजी संपुष्टात आल्यामुळे कु. गजेश्री गोरे यांना शासकिय नोकरी मिळण्यास अडचण निर्माण झाली. ही बाब जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निदर्शनास येताच त्यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेत संबंधित महसूल सहायक माधव हरी फुलवळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यामुळे त्यांना शासन सेवेतून निलंबित केले.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# यंत्राकडून प्रेम कसे मिळणार?

आधुनिक तंत्रज्ञानाने मानवी जीवनाला वेग, सोय आणि नवे पर्याय दिले असले, तरी त्याच वेळी काही मूलभूत प्रश्नही उभे केले आहेत. चीनमधील तरुणाईमध्ये वाढत असलेला एक नवा ट्रेंड 'कृत्रिम बुद्धिमत्ता'च्या मदतीने माजी प्रियकर किंवा प्रेयसीची डिजिटल प्रतिकृती तयार करणे, हा त्याचाच एक गंभीर नमुना आहे. प्रथमदर्शनी हा उपाय भावनिक जखमा भरून काढणारा वाटू शकतो; परंतु खोलवर विचार केला, तर तो मानवी नातेसंबंधांच्या अस्तित्वालाच आव्हान देणारा ठरू शकतो. प्रेमभंग हा मानवी आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा असतो. नकार, वेगळेपण किंवा तुटलेले नाते स्वीकारणे कठीण असते, हे खरे. मात्र अशा वेळी 'एआय'चा आधार घेऊन माजी जोडीदाराची डिजिटल प्रतिमा तयार करणे, हे वास्तवापासून पळ काढण्यासारखे आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या जुन्या आठवणी, संवादशैली, फोटो, व्हॉईस नोट्स यांचा वापर करून 'जिवंत' वाटणारी कृत्रिम व्यक्ती तयार करते. ती बोलते, प्रतिक्रिया देते आणि जणू काही खऱ्या व्यक्तीसारखी वागते. पण हा सर्व अनुभव कृत्रिम आहे, तो भावना देत नाही, तर केवळ त्याची नक्कल करतो. यंत्राकडून प्रेम मिळू शकत नाही, ही मूलभूत गोष्ट येथे लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. प्रेम म्हणजे केवळ संवाद नाही; त्यात संवेदना, समज, त्याग, मतभेद आणि स्वीकार यांचा समावेश असतो. कृत्रिम बुद्धिमत्ता या भावनांची केवळ पुनरावृत्ती करू शकते, पण त्यांना अनुभवू शकत नाही. त्यामुळे अशा डिजिटल नात्यांमध्ये माणूस एकतर्फी गुंतत जातो, आणि त्याला मिळणारा प्रतिसाद हा केवळ प्रोग्राम केलेला असतो. परिणामी, व्यक्ती वास्तवातील नात्यांपासून दूर जाऊ लागते. याचा सर्वात मोठा धोका म्हणजे भावनिक परावलंबित्व. जेव्हा एखादी व्यक्ती सतत 'एआय'वर आधारित नात्यावर अवलंबून राहते, तेव्हा तिची वास्तविक माणसांशी संवाद साधण्याची क्षमता कमी होऊ शकते किंवा ती संपुष्टात येऊ शकते. अशी व्यक्ती कुटुंबापासून, समाजापासून दूर जाण्याचाही धोका निर्माण होतो. वास्तविक नात्यांमध्ये येणाऱ्या अडचणी, मतभेद, तडजोडी यांचा सामना करण्याची तयारी कमी होते. कारण 'एआय'सोबतचे नाते नेहमीच सोयीचे, आपल्या मनासारखे आणि नियंत्रणात असते. अशा परिस्थितीत मानवी नात्यांची गुंतागुंत टाळण्याची प्रवृत्ती वाढते, जी दीर्घकालीन दृष्टीने घातक आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या तंत्रज्ञानामुळे व्यक्ती 'भूतकाळात अडकून' राहू शकते. प्रेमभंगानंतर पुढे जाण्याऐवजी, ती व्यक्ती सतत जुन्याच नात्यात रमते. यामुळे मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो जसे उदासीनता, एकाकीपणा आणि वास्तवाशी तुटलेपण वाढू शकते. माणूस जिथे नवीन नात्यांची उभारणी करायला हवी, तिथे तो कृत्रिम जगात अडकून पडतो. गोपनीयतेचा मुद्दाही तितकाच गंभीर आहे. एखाद्या व्यक्तीच्या संमतीशिवाय तिचे फोटो, चॅट्स किंवा आवाज वापरून डिजिटल प्रतिकृती तयार करणे हे नैतिक आणि कायदेशीरदृष्ट्या चुकीचे ठरू शकते. अशा प्रकारे एखाद्याची 'ओळख' वापरणे हे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि गोपनीयतेवर अतिक्रमण आहे. भविष्यात या तंत्रज्ञानाचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यंत्र आणि माणूस यांच्यातील सीमारेषा अधिकाधिक धुसर होत असताना, मानवी मूल्यांचे जतन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे, पर्याय नाही. ते मानवी नात्यांची जागा घेऊ शकत नाही. प्रेम, मैत्री, आपुलकी या भावना जिवंत ठेवण्यासाठी प्रत्यक्ष संवाद, सहवास आणि अनुभव आवश्यक असतात. कृत्रिम बुद्धिमत्ता या गोष्टींची नक्कल करू शकते, पण त्यांची जागा घेऊ शकत नाही. आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे तंत्रज्ञानाचा समतोल वापर, हे आहे. 'एआय'चा वापर सर्जनशीलता, शिक्षण आणि विकासासाठी करणे आवश्यक आहे; मात्र भावनिक आयुष्य त्यावर अवलंबून ठेवणे धोकादायक आहे. प्रेमभंग ही जीवनातील एक प्रक्रिया आहे, ज्यातून माणूस शिकतो, परिपक्व होतो आणि पुढे जातो. त्या प्रक्रियेला वळसा घालण्याचा प्रयत्न केल्यास, व्यक्तिमत्त्वाच्या विकासालाच अडथळा निर्माण होतो. कारण मानवी नात्यांचे अस्तित्त्व हे केवळ संवादावर नव्हे, तर भावनिक सत्यतेवर अवलंबून आहे. कृत्रिम नात्यांच्या आहारी गेल्यास, माणूस माणसापासून दूर जाईल आणि समाजात एकाकीपणा वाढेल. त्यामुळे तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना विवेक आणि मर्यादा यांचे भान ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा, 'प्रेम' या सुंदर भावनेचे रूपांतर केवळ एका कृत्रिम आणि पोकळ अनुभवात होण्याचा धोका नाकारता येणार नाही.

# बाह्य बदलापेक्षा अंतरिक बदल आवश्यक

एकदा मी माझा उपवास आहे म्हणून, कुठे काही खायला मिळेल का, म्हणून त्या प्रचंड झगमगाट असलेल्या शहरात भटकत असताना, तिथे एका दुकानात केळ दिसली. मला आश्चर्य वाटलं, की इथे दुकानात केळ मिळतात. चला आपणास उपवास आहे, म्हणून मी तिकडे जाऊन त्या केळांबद्दल दुकान मालकास विचारले, तर त्याने मला सांगितले, की ती केळं विकायचे नाहीत, पण मी खूप आग्रह केला व त्यांना त्या केळी मला विकत द्यायला सांगितल्या, त्यावर शेवटी माझ्या आग्रहाखातर त्यांनी मला केळी दिल्या. आता आपणास ती केळ खायला मिळणार हा मनातील आनंद गगनात मावेनासा झाला. ती केळी घेऊन दूर निवांत बसून खाण्याचा विचार डोक्यात आला व मी तसे करत असताना, मला आश्चर्याचा धक्काच बसला व त्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न आजही करतो आहे. झाले असे, की केळांची साल निघता निघेना, खूप प्रयत्न केल्यावर लक्षात आले, की ती केळ वास्तवात केळ नव्हतीच, तर ती प्लास्टिकची (शोभेची) केळीची हुबेहुब प्रतिकृती होती. म्हणजे ती केळ प्लास्टिकची होती.

या वरील गोष्टीवरून काय लक्षात येते, की ती फक्त दिसायला केळी होती, पण असायला नव्हती. आता इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की बऱ्याच गोष्टी दिसायला असतात, पण असायला नसतात. यावरून मी त्यांचे तीन गटात वर्गीकरण करतो. १) काही वस्तू व बाबी दिसायला असतात, पण असायला नसतात. उदा : वरील सांगितलेली प्लास्टिकची केळी. २) काही वस्तू मात्र असायला असतात, पण दिसायला नसतात. उदा: दुधात लोणी आहे, पण ते दिसायला नाही, ते असायला आहे, पण दिसायला नाही. ३) याउलट काही बाबी व वस्तू दिसायला व असायला पण असतात. उदा: सगळ्याच भौतिक वस्तू.

आता नेमकी हीच बाब खूपच चिंतनीय आहे. आपण आज आधुनिक जगात जगतोय, किंबहुना त्याही पुढचं उत्तर आधुनिक जीवन जगतोय. आम्ही खूप आधुनिक झालोय व आम्ही समाजात खूप बदल केलाय, या भ्रमिष्ट बेडीत आपण सारे आडकलोय. आपण आजचे आधुनिक जीवन वरील गट १ प्रमाणे जगतोय. अर्थातच याला काही अपवाद आहेत पण ते अपवाद अगदी नगण्य असून, आपणास समग्रास प्राधान्य द्यायचे आहे. आपण गट २ नुसार आपल्या जगण्यात बदल करणे अपेक्षित आहे. हा बदल कायम व अमूर्त तसाच अंतरंगातील आहे. पण आज आधुनिक व बाह्य बदलाचा दिवा, हातात घेऊन पुढे जाताना, आपण हे विसरलोय, की त्याच दिव्याखाली अंतरंगातील बदलाचा अंधार पसरला आहे. असे म्हणतात की, जे जसं दिसतं, ते तसं नसतं.

खरंच हे भयानक वास्तव, आज मूर्त रुपात दिसून येत आहे, कारण, आजचा भौतिक माणूस, केवळ तो बदलला आहे या भ्रमात, मनमुराद जीवन जगतोय. आता चिंतन याचे करावयाचे आहे, की खरंच आपण बदल केलाय का? जो बदल आपण केलाय, असे फक्त आपणास वरवरून भासत आहे, हा बदल केवळ दिसायला आहे, पण तो असायला नाही. बदलाची गती ही खूप हळू असते. पण आजचा भौतिक बदल वाऱ्याच्या वेगाने होत असून, तो केवळ आर्धे व बाह्यरूप धारण करून, आपले मूर्त व नाशवंत साम्राज्य पसरवत आहे. कारण वास्तविक बदलाची, गती संथ असते.

जर प्राचीन काळापासून विचार केला, तर सर्वात अगोदर सामाजिक बदल करण्याचा प्रयत्न, गौतम बुध्दांनी केला. त्यानंतर संतांनी पुन्हा सुधारकांनी, पण सामाजिक परिवर्तन करण्यासाठी खूप प्रयत्न केले. मग त्यानंतर संविधानात, पण अनेक कायदे करूनही, खरंच आपण बदललो का? तर नाही, असेच याचे उत्तर असेल. आपण जी बदलाची टिमकी वाजवतो, ती केवळ भौतिक स्वरूपाची असून, ती फक्त वर सांगितल्याप्रमाणे दिसायला आहे, पण असायला नाही. मग आसने म्हणजे काय असते, तर त्यात फक्त अमूर्त, अंतरंगातील बदलांचा समावेश होतो. जे काही अमूर्त आहे, तेच शाश्वत व सत्य असते. त्यात वरवरचा व भ्रमिष्ट बदल अपेक्षित नसून आतून, वैचारिक दृष्टीतून माणूस बदलावा व त्या बदलाने इतर लोकांमध्ये पण सकारात्मक व समाज उपयोगी बदल घडवून आणावा हे त्याचे खरे रूप आहे.

आकाश लहान वाटेल, एवढ्या उंच इमारती आपण आज उभ्या केल्या, पण बाजूला झोपडीतील गरिबी आणखी शिल्लक आहे. धार्मिक निरपेक्षता कितीही मिरवली, तरी धर्मा धर्मावर आधारित भांडणे, मारामाऱ्या यांचे अनेक दाखले आजही आढळतात. जातीपातीच्या भिंती आपण कितीही जरी मोडून काढण्याचा प्रयत्न केला, तरी भयाण वास्तवाचं चित्र काही वेगळंच आहे. हा सामाजिक भेदाचा शाप आपल्याला असा काही चिकटून बसलाय ,की आपण कितीही आधुनिक जीवन जगलो, तरी ती बाब आपल्या मनात, जीवनात इतकी ठासून बसलीय, की तिच्यासाठी आपणास अंतरंगातील बदल आवश्यक आहे. लोकसंख्या,प्रदूषण,बेरोजगारी, दहशतवाद, नक्षलवाद, प्रांतवाद, सामाजिक विषमता, धर्मनिपेक्षतेच्या समस्या यामध्ये हवा तेवढा बदल, आणखी झालेला नाही, ही वस्तुस्थिती आपणास नाकारता येणार नाही. जरी आपण फार बदल झालाय, असा आव आणत असू ,तरीही प्रत्यक्ष चित्र फार वेगळं व भयावह आहे.

दिवसेंदिवस स्त्रियांवरील बंधने,अत्याचार, बलात्कार, या व इतर अनेक अन्याय ग्रस्त बाबी, आजही तोंड काढून आपणासमोर उभ्या आहेत.. मग हाच आपला बदल आहे का? तर नाही, यासाठी असा बदल आवश्यक आहे, की जो भलेही दिसायला नसेल पण असायला पाहिजे. असे म्हणतात की, जर नसेल अंतर मन निर्मळ तर काय करेल साबण.

आपण जर आतल्या, म्हणजे अंतरंगातील बदलास प्राधान्य देत, भौतिक बदल घडवला, तर आपण खरेच बदललो असे होईल. डॉ. अब्दुल कलाम यांना, भारत २०२० पर्यंत जागतिक महसत्ता बनवायचा होता. आता आपण किती बदल केलेत व कलामांना अपेक्षित असलेला भारत, आणखी किती दूर आहे हे आपण इथे आवर्जून लक्षात घेतले, तर आपल्या भ्रमाचा भोपळा फुटेल व आपणास वास्तवाची जाणीव होईल. अलीकडेच आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. आता हे जे स्वातंत्र्य आपण मिळवले त्यात समग्रतेचे दर्शन होते का? म्हणजे सर्वसामान्य माणसाला ह्या स्वातंत्र्याचा उपयोग आहे का?

आपल्याला घटनेने दिलेल्या आचार, विचार स्वातंत्र्याचा हक्क खरच दिला जातो का? की आपला आवाज दाबला जातो...? या बाबीचा विचार होणे आवश्यक आहे.

आजही अनेक ठिकाणी सामान्य माणसाला माणूस म्हणून जगताना, किती सामाजिक भेद, विषमता या व अनेक बाबींचा सामना करावा लागतो. मग आपण खरच बदललो का ? आजचा आधुनिक बदल म्हणजे, नव्या बाटलीत जुनीच औषधी देणे आहे. याने रुग्ण बरा होईल का? समाजातील स्त्रियांकडे आजही भोगवस्तू म्हणूनच पाहिले जाते. आपण स्त्रीमुक्ती दिन साजरा केला म्हणून ती खरंच मुक्त आहे का? नाही, हा बदल केवळ दिसायला आहे, पण तो असायला नाही. आजही बऱ्याच ठिकाणी स्त्रीची अवस्था नखे नसलेली वाघीण अशी दिसते. आपला तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आजही मलीन आणि विशुद्ध आहे. रस्त्यावरील हल्ले, विनयभंग, बलात्कार या बाबींचे दाखले, आपण खरच परिवर्तन आणले आहे का? याची चाचपणी करण्यासाठी पुरेशा आहेत. स्त्रीकडे पाहण्याची आपली नजर सापासारखी असून, तिला दंश करण्यासाठी, पुरुषरुपी साप टपून बसलेले असतात. ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न आजही तसेच बेवारस स्थितीत आहेत, त्यात फारसा बदल झालेला नाही. यासोबतच गरिबीचा भयानक प्रश्न उभा असून, एकीकडे श्रीमंती रुपी चंद्र आहे, तर दुसरीकडे दारिद्र्य रुपी अंधाराची रात्र आहे, ही बाब आपणास काय दर्शवते?. आपण कितीही समृद्ध झालो असलो, तरीही सगळ्यात मोठा गरिबी, बेकारी यांचा प्रश्न आणखी सोडवू शकलो नाहीत, त्यामुळे मुठभर श्रीमंत लोक म्हणजे पूर्ण देश किंवा समाज नव्हे. काही लोक आधुनिक जीवन जगतात, म्हणजे ते समग्र परिवर्तन आहे का?. म्हणून विचारातून, आचरणातून, अमूर्त स्वरूपाचे परिवर्तन व बदल हाच बदलाचा आदर्श नमुना असू शकतो. कितीही आधुनिक जीवन जगले, तरीही व आपण बदल करण्यात यशस्वी झालो आहोत, असे म्हणून कितीही दवंडी पिटवून पुढे गेलो, तरी वास्तवाचे चटके फार भयानक असतात.

केवळ भौतिक बदल म्हणजे सायकलचे एक चाक धावत असून, आपण पुढे जातोय ही बाब मनाला फसवे समाधान देणारी आहे. पण वास्तव हेच आहे, की सायकल दोन्ही चाकावर अवलंबून असते, म्हणून समाज रुपी सायकलचे, केवळ भौतिक चाक धावून फायदा नाही, तर त्याचे बौद्धिक,वैचारिक, अमूर्त चाक पण चालवावे लागेल व तेव्हाच आपण खरा व वास्तविक बदल करण्यात यशस्वी झालो असे म्हणता येईल. नाहीतर वरवरचा बदल, सुरवातीस वर उल्लेख केलेल्या केळा प्रमाणे, केवळ दिसायला असेल, पण असायला असणार नाही. स्वातंत्र्य प्राप्त करून आज साडे सात दशक उलटून गेली व आपण केवळ भौतिक बदल घडवला म्हणजे आपण केवळ अर्धा भाग घेऊन पुढे जातोय. हा केवळ भौतिक झगमगाट असून, तो केवळ दिसायला आहे. म्हणून जो बदल आतून आहे, कायम आहे, सत्य व आमर आहे असा बदल म्हणजे विचारातील व आपल्या आंतरिक दृष्टीतील होय. मग हीच आंतरिक दृष्टी, आपण समाजात सगळ्याच बाबतीत वापरली, तर हे सामाजिक भेदाचे चक्र भेदायला मदत होईल.पण त्यासाठी ह्या बाह्य बदलास, आंतरिक बदलाची जोड देऊन, समाज रुपी सायकलचे दोन्ही चाक धावते ठेवावे लागतील. म्हणून, आजचा आधुनिक बदल अमूर्त व आंतरिक बदला शिवाय अर्धा व अपूर्णच राहणार असून त्याला पूर्णत्व देण्याचे सर्वात महत्त्वाचे स्त्रोत आपणच आहोत...

नको रे केवळ दिसण्यावर जाऊ,
हे आधुनिक माणसा, आतून
असण्यावर पूर्ण लक्ष देऊ.

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोही पिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

# सत्कर्माचे फळ



आज सकाळपासून वरूणराजा जास्तच कोसळत होता. कुणावर एवढा चिडला होता देव जाणे! पण सगळी माणसे चिडीचूप घरात बसून होती कामावर जाण्यासाठीसुद्धा पावसाने उघडीप दिली नव्हती. महानगरीतले रस्ते गढूळ पाण्याने वाहून भरून गेले होते. धुक्यामुळे समोरची इमारतही दिसत नव्हती. सुमनला आज कामावर जावेच लागणार होते. मालकीणबाईंनी कालच सक्त ताकीद दिली होती, सुमन माझ्या एकुलता एक बाळाचा वाढदिवस आहे उद्या अजिबात दांडी मारू नकोस आणि उशिराही येऊ नकोस. उद्या मालकीण बाईंच्या बाळाचा वाढदिवस सोहळा होता. मालकीणबाई सुधाताई स्वभावाने खूप प्रेमळ आणि दानशूर होत्या. सुमनला कधी पैशाची गरज लागली तर त्यांनी हात आखडता घेतला नव्हता. कधी करणार पैसे परत? असेही कधी विचारले नव्हते. अर्थात आपण त्यांना पगारातून कापून घ्यायला सांगायचो, पण वेळेला पैसे मिळणे महत्वाचे! त्या म्हणत, तुझ्याकडे वाचतील तेव्हाच दे सुमन नाहीतर पगार कमी आला की पुन्हा उचल घ्यावी लागेल. सुमनलाही ते पटत होते कारण दोन शाळेला जाणारी लेकरे त्यांचा शिकवणीचा खर्च, खाणे पिणे. नवरा दिनकर रात्रंदिवस पिऊन तर्र असायचा. त्याला संसाराचे ना सुख न दुःख! जबाबदारी तर अजिबातच नाही.

सुमनला हातातोंडाची मिळवणी करताना नाकी नऊ यायचे. पण लेकरांसाठी ती सर्व सहन करत होती. गेल्या दोन वर्षात कोरोनाने मांडलेल्या उच्छादाने भल्याभल्यांना कंगाल केले मग हातावर पोट असणाऱ्यांची अवस्था निराळी कशी असेल! सुमनलाही कोरोना काळात उपासमारीचा सामना करावा लागला, पण तिची मालकीणबाई दानशूर आणि चांगल्या स्वभावाची असल्याने सर्व काही व्यवस्थित निभावले. शिवाय सुमनने घरी बसून चार पैसे मिळवल्याने तिची लेकरे खाऊन पिऊन राहू शकली. पण दिवसेंदिवस तिला ते कठीण जात होते. खर्च आणि महागाई वाढत होती. त्यामुळे पदरमोड करून संसार चालवावा लागत होता. ती सुद्धा त्यांच्या घरात अगदी प्रामाणिकपणे काम करत होती. त्यांच्या गैरहजेरीत बाळाची चांगली काळजी घेत होती. त्यामुळे त्याही खुश होत्या.

घर आणि बाळाला ती चांगले सांभाळत असल्याने सुधाताई आणि माणिकराव घराबाहेर पडून चार पैसे कमवू शकत होते. आज सुमन नसती तर इवल्याशा बाळाला कोणी सांभाळले असते. सुधाताईंची ओढाताण झाली असती, नाहीतर नोकरीचा राजीनामा द्यावा लागला असता. अशा प्रेमळ स्वभावाच्या मालकीणबाईंच्या अडीअडचणीला आपण जर उभा राहिलो नाही तर आपल्या जीवनाचा काय उपयोग! असा मनाशी विचार करून सुमन मोडकी छत्री हातात घेऊन घराबाहेर पडली. तिच्या घराबाहेर जागोजागी पाण्याची डबकी भरून वाहत होती. रस्त्यावर एखाद दुसरी गाडी किंवा माणसे होती. एवढ्या मोठ्या पावसात कोण आपल्या जीवाची रिस्क घेणार! पण सुमनला आज घराबाहेर पडणे भागच होते. तिने साडी वर खोचली आणि खाली पाहून झपझप पाय उचलू लागली. पाऊस कमी होण्याचे नाव घेत नव्हता. सगळे रस्ते ओहोळ ओढ्यांनी तुडुंब भरून वाहत होते. सुमनला आता स्वतःची पर्वा नव्हती. थोड्याच वेळात कामाच्या ठिकाणी पोहोचले की मग काही काळजी नव्हती. पावसामुळे शाळांना सुट्टी होत्या. ती मुलांचा, नवऱ्याचा स्वयंपाक करून निघाली होती. त्यामुळे तिला त्यांची काळजी नव्हती.

आता थोडाच अवकाश! ती मालकीणबाईंच्या घरात पोचणार होती पण हे काय झाले! तिच्या समोरून जाणारा एक दहा वर्षाचा मुलगा पाहता पाहता रस्त्यावरील पिपहोलमध्ये बुडत असल्याचे तिला दिसले. क्षणभर तिच्या डोळ्यासमोर अंधार आला पण तिने स्वतःला सावरले आणि पळतच त्या मुलाला वाचवायला गेली. मुलगा वाचवा वाचवा असे जीवाच्या आकांताने ओरडत होता. रस्त्यावर तुरळक वाहतूक होती पण प्रत्येकाला पावसापासून वाचण्यासाठी इच्छित स्थळी पोहोचण्याची घाई होती. सुमन धावतच मुलाजवळ गेली. मुलगा डबक्यात खाली वर करत होता. त्याच्या नाकातोंडात पाणी गेले होते. आता जणू तो बेशुद्ध पडण्याच्या स्थितीत होता. सुमनने जोरजोरात ओरडायला सुरुवात केली. एक-दोन वाटसरू तिथे आले पण अचानक मुलगा दिसायचा बंद झाला.

कसा कोण जाणे ट्राफिक पोलीस तिथे पळतच आला आणि त्याने झटक्यात मुलाला वर खेचले. मुलाचा वर दिसत असलेला हात धरून त्याला वर खेचले. मुलगा खड्ड्यातून बाहेर आला पण भीतीने आणि नाकातोंडात पाणी गेल्याने बेशुद्ध झाला होता. बघे मुलगा वाचल्याचे कळताच आपापल्या मार्गाने पसार झाले, पण सुमनला आपल्या डोळ्यासमोर आपली मुले दिसली आणि तिने मुलाला शुद्धीवर आणण्यासाठी ट्राफिक पोलिसाला प्रयत्न करायला सांगितले. त्याने एक रिक्षा बोलवून मुलाला घेऊन सुमनला रूग्णालयात घेऊन जायला सांगितलं. सुमन मुलाला घेऊन रिक्षात बसली खरी पण हा मुलगा कोण? कुठला? तिला काहीच माहित नव्हते. तरीही माणुसकीच्या नात्याने ती त्याला घेऊन जवळच्या रूग्णालयात पोहोचली आणि काउंटरवर जाऊन हात जोडले , साहेब हा मुलगा पाण्यात बुडता बुडता वाचला. लवकर डॉक्टरांकडे घेऊन चला नाहीतर तो मरेल. तो बेशुद्ध झाला आहे. काउंटरवरचा माणूस म्हणाला, कोण आहे तो? तुमचा मुलगा आहे का? तशी सुमन बोलली, हो साहेब हा माझाच मुलगा आहे. लवकर डॉक्टरांना बोलवा. तशी एक नर्स तिथे पळत आली आणि मुलाकडे पाहत किंचाळली, रोहन काय झाले तुला? अरे तू क्लाससाठी जातो म्हणून घरातून बाहेर पडला होतास ना! तिने सुमनला काय झाले ते विचारले. सुमनने थोडक्यात काय झाले ते सांगितले. तसे नर्सने त्याला ताबडतोब डॉक्टरांच्या केबिनमध्ये नेले. सुमन बाहेरच्या बाकड्यावर बसून राहिली. डॉक्टरांनी राहुलच्या पोटातील पाणी बाहेर काढले, त्याला इंजेक्शन दिले आणि नर्सकडे बघून म्हणाले, सिस्टर आता हा ठीक आहे. काळजीचे काहीच कारण नाही. थोड्या वेळात हा शुद्धीवर येईल. मी त्याला इंजेक्शन दिले आहे. नर्स डॉक्टरांच्या केबिनबाहेर आली आणि तिने सुमनच्या पायावर चक्क लोटांगण घातले.

रोहन त्या नर्सचा मुलगा होता. ती सकाळी ड्युटीवर आली होती आणि रोहन तिला क्लासला जातो म्हणून घराबाहेर पडला होता. पाऊस जास्त झाल्याने त्याला पिपहोलचा अंदाज आला नाही आणि तो बुडू लागला होता. आज सुमन त्याला इथे घेऊन आली नसती तर रोहन जीवाला मुकला असता. नर्सने सुमनच्या पायावर आपल्या अश्रूंचे सिंचन केले. ती म्हणाली, बाई आज तुम्ही नसता तर माझ्यावर कोणता प्रसंग उडवला असता याची कल्पनाही करवत नाही. तुम्ही माझ्या मुलाला इथे आणले नसते तर मी काय पाहिले असते! तशी सुमन बोलली, अहो सिस्टर तुम्ही हजारो लोकांचे प्राण वाचवण्यासाठी इथे काम करता तेव्हा कुणाच्यातरी रूपाने देवपण तुमची मदत करतो. मी काही जगावेगळे केले नाही. माणूस म्हणून माझे कर्तव्य पार पाडले. आता सुमनला कामाला जायची आठवण आली. तिकडे मालकीण बाई वाट पाहून कंटाळल्या असतील. घाई घाईत तिने सिस्टरचा निरोप घेतला. तशी सिस्टरने पर्समध्ये हात घालून पाचशेच्या हातात येतील तेवढ्या नोटा बाहेर काढल्या आणि सुमनला म्हणाली, घ्या बाई आज तुम्ही माझा काळजाचा तुकडा मृत्यूच्या दारातून बाहेर काढला आहे. तुमचे उपकार या जन्मातही मी फेडू शकणार नाही, पण फुल ना फुलाची पाकळी म्हणून हे ठेवा जवळ असे म्हणत हातातील नोटा सुमन नको नको म्हणत असतानाही तिने ते पैसे सुमनच्या हातातील पिशवीत कोंबले.

सुमनच्या सद्वर्तनामुळे एका मुलाचा जीव वाचला होता आणि तिच्या उपाशीपोटी लेकरांचा आत्मा प्रसन्न होणार होता. तिने नमस्कार करून सिस्टर चा निरोप घेतला आणि पुन्हा भेटू म्हणत रूग्णालयाबाहेर पडली. आज तिच्या सत्कार्मामुळे तिच्या जीवनाचे सार्थक झाले होते.

**-सौ.भारती सावंत**
खारघर, नवी मुंबई
मो. ९६५३४४५८३५

# निवडणुकीत होणारी हिंसा अयोग्य

निवडणुका आणि हिंसा हे आपल्या लोकशाहीला नवे नाही. निवडणुकीत हिंसाचार होतोच मग ती ग्रामपंचायतीची निवडणूक असो की विधानसभा, लोकसभेची. हिंसाचार झाल्याशिवाय निवडणुका पार पडत नाहीच असा आपला अनुभव आहे. विशेषतः उत्तर भारतीय हिंदी भाषिक पट्ट्यातील राज्यात तर निवडणुका आणि हिंसाचार हे एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या आहेत. त्यामानाने महाराष्ट्रात खूप चांगली परिस्थिती आहे. आपल्या राज्यातील निवडणुकीत हिंसाचाराचे प्रमाण तुरळक असते. पण इतर राज्यात मात्र निवडणुकीआधी किंवा निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होतो.

आता पश्चिम बंगालचेच पहा ना या राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल घोषित होताच मोठा हिंसाचार उसळला. निवडणुकीचा निकाल घोषित होताच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यात हाणामारी, मारामारीच्या घटना घडल्या. इतकेच नाही तर तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनाही घडल्या. या हिंसाचारात ४ कार्यकर्त्यांची हत्या झाली तर शेकडो कार्यकर्ते जखमी झाले. भाजपचे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार व वरिष्ठ नेते सुवेंदु अधिकारी यांचे पी. ए. चंद्रनाथ रथ यांचीही गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. पोलिसांनी हिंसाचार प्रकरणी ४०० कार्यकर्त्यांना अटक केली असून तेथील परिस्थिती तणावपूर्ण आहे. हा हिंसाचार थांबण्यासाठी पोलिस दल सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे पण परिस्थिती नियंत्रणाबाहेर चालली आहे. अर्थात पश्चिम बंगालला निवडणुकीतील हिंसाचार नवा नाही.

मागील विधानसभा निवडणुकीच्या आधीही तिथे असाच हिंसाचार उसळला होता. तेंव्हा झालेल्या हिंसाचारात तर ३५ जणांची हत्या झाली होती इतकेच नाही तर त्यावेळी हिंसाचारात बॉम्बचस्फोट देखील करण्यात आला होता. आताही जवळपास तशीच परिस्थिती बंगालमध्ये आहे. हा हिंसाचार भाजपचे नेते आणि कार्यकर्ते घडवून आणत आहेत असा आरोप तृणमूल काँग्रेसने केला आहे तर ममता बॅनर्जींच्या इशाऱ्यावर तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते पश्चिम बंगालमध्ये हिंसा घडवून आणत आहेत असा आरोप भाजपतर्फे केला जात आहे. हे दोन्ही पक्ष हिंसाचार प्रतिस्पर्धी पक्षाने घडवून आणला असा आरोप करत असले तरी हिंसाचारात दोन्ही बाजूचे कार्यकर्ते सहभागी असल्याने या हिंसाचारास भाजप आणि तृणमूल हे दोन्ही पक्ष तितकेच जबाबदार आहेत असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये उसळलेल्या या राजकीय हिंसाचाराचे समर्थन कोणी करणार नाही. हिंसा ही निषेधार्हच असते. लोकशाहीत हिंसेला थारा नाही. पश्चिम बंगालमधील या हिंसाचारात ४ कार्यकर्त्यांचा बळी गेला ही चिंताजनक बाब आहे. भारतीय लोकशाहीसाठी तर ही भयावह अशीच बाब आहे. भारतीय लोकशाहीसाठी हे शुभचिन्ह नाही वास्तविक लोकशाहीत हिंसेला स्थान नाही. पण सध्या जे घडत आहे त्याने लोकशाहीचे धिंडवडे निघत आहे.

निवडणुकीत होणारी हिंसा कमी करण्यासाठी निवडणूक आयोगाने ठोस धोरण आखायला हवे. हिंसाचारास जबाबदार असणाऱ्या राजकीय नेत्यांवर व पक्षांवर बंदी आणून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करायला हवी. निवडणूक आयोगाने हिंसामुक्त निवडणुकीसाठी कठोर पावले उचलायला हवीत.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# कुंडलवाडी येथील बँकांमध्ये गेल्या दीड महिन्यांपासून रोकड टंचाई कायम; नागरीक त्रस्त

- मे महिना उजाडला तरी पैशाची चणचण कायम
- हरभरा, तंबाखू, मका पिकांची रक्कम बँकेत अडकली; शेतकरी हवालदिल



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** कुंडलवाडी शहरातील विविध बँकांमध्ये सध्या तीव्र रोकड टंचाई निर्माण झाल्याचे चित्र असून, याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांसह, शेतकरी लग्नसराईतील वधू-वर पित्यांना बसत आहे. शहरात एकूण सहा बँका असतानाही कोणत्याच बँकेत पुरेशी रोकड उपलब्ध नसल्यामुळे खातेदारांना वारंवार बँकेच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासूनच बँकांमध्ये पैशांची चणचण जाणवू लागली होती. मात्र एप्रिल महिन्यात ही समस्या अधिकच तीव्र झाली. मे महिन्याची ७ तारीख उलटली असूनसुद्धा अनेक बँकांमध्ये ग्राहकांना रोख रक्कम मिळणे कठीण झाले आहे. एटीएम केंद्रेही बहुतांश ठिकाणी बंद किंवा 'नो कॅश' अवस्थेत दिसत असून ती केवळ शोभेची वस्तू ठरत आहेत.

सर्वाधिक फटका शेतकऱ्याला बसत असून, हरभरा, ज्वारी, मका व तंबाखूचे विकलेले पैसे बँकेत आले, पण बँकेतून पैसे मिळत नसल्याने नौकरदारांची नोकरी, मजूरदारांची मजुरी व इतर देणे थांबल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

या परिस्थितीचा परिणाम बाजारपेठेवरही दिसून येत आहे. रोख रक्कम नसल्यामुळे नागरिकांना खरेदी-विक्री करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सध्या सुरू असलेल्या लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर वधू-वर पित्यांची मोठी अडचण होत आहे. लग्नासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी बँकेतून पैसे काढण्याच्या आशेने अनेकजण रांगेत उभे राहत आहेत; मात्र बँकेतच रोकड नसल्यामुळे त्यांची निराशा होत आहे.

कुंडलवाडीतील स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, महाराष्ट्र ग्रामीण बँक, डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटीव्ह बँक, भाग्यलक्ष्मी बँक तसेच बुलडाणा अर्बन बँक या प्रमुख बँकांमध्येही सध्या रोकड उपलब्ध नसल्याचे समोर येत आहे. ही परिस्थिती लवकर सुधारेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत असून, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन बँकांमध्ये पुरेशी रोकड उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

## नांदेड- शकूर बस्ती- नांदेड दरम्यान किनवटमार्गे उन्हाळी विशेष गाडी धावणार



**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता तसेच प्रवाशांना अधिक प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने पुढील ट्रेन ऑन डिमांड विशेष गाड्यांची एक फेरी करण्याचा निर्णय घेतला आहे.

गाडी क्रमांक ०७६५८ नांदेड-शकूर बस्ती ही विशेष गाडी गुरुवार, दि. २१ मे रोजी रात्री नांदेड येथून २३:२० वाजता सुटेल आणि किनवट, वनी, नागपूर, भोपाल, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, आग्रा, मार्गे शकूर बस्ती येथे २३ मे ला सकाळी १०.१५ वाजता पोहोचेल.

परतीच्या प्रवासात गाडी क्र. ०७६५९ शकूर बस्ती - नांदेड विशेष गाडी दिनांक २४ मे रोजी शकूर बस्ती येथून रात्री २२.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच हुजूर साहिब नांदेड येथे दिनांक २६ मे रोजी सकाळी ९ वाजता पोहोचेल.

प्रवाशांनी या विशेष गाड्यांचा लाभ घेऊन आपला प्रवास सोयीस्करपणे नियोजित करावा, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे करण्यात आले आहे.

## संलग्न मालमत्तेच्या विक्रीबाबत 'सीआयडी'चे मांडवी ग्रा.पं.ला पत्र



**किनवट (प्रतिनिधी)–** एमपीएससीसह इतर स्पर्धा परीक्षेतील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी एकूण १६ स्थावर व जंगम मालमत्ता न्यायालयाने संलग्न केल्या आहेत. त्या मालमत्तांची विक्री होत असल्याच्या तक्रारीनंतर नांदेडच्या गुन्हे अन्वेषण विभागाने मांडवी ग्रामपंचायतीस पत्र देऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातर्फे आयोजित स्पर्धा परीक्षेत आर्थिक उलाढालीतून गैरव्यवहार केल्याप्रकरणी मांडवी येथील प्रबोध मधुकर राठोड यांच्याविरुद्ध पाच वर्षांपूर्वी विविध कलमान्वये विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. स्पर्धा परीक्षांतील गैरव्यवहारातूनच आरोपी राठोड यांनी स्वतः व आपल्या नातेवाईकांच्या नावे मांडवी,पाटोदा, संभाजीनगर, नांदेड या ठिकाणी एकूण १६ स्थावर व जंगम मालमत्ता घेतली आहे. गैरव्यवहाराचे प्रकरण उघड झाल्यानंतर न्यायालयाने उपरोक्त मालमत्तांच्या चौकशीचे आदेश नांदेडच्या गुन्हे अन्वेषण विभागाला दिले होते. चौकशीअंती दि.२३ एप्रिल २०२१ रोजी प्रबोध राठोड यांची सर्व स्थावर व जंगम मालमत्ता संलग्न केली होती. प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना कुठल्याही मालमत्तेची कुठेही रजिस्ट्री करता येते, या शासनादेशाचा फायदा उठवत राठोड यांनी संलग्न मालमत्तेपैकी काही मालमत्ता विक्री केल्याची तकार या प्रकरणातील मुख्य तक्रारदार योगेश जाधव यांनी केली होती.

या तक्रारीची दखल घेत नांदेडच्या गुन्हे अन्वेषण विभागाने मांडवी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना प्रबोध राठोड यांच्या संलग्न स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती देत दि.२३ एप्रिल २०२१ ते आजपावेतो वरील मालमत्तेपैकी काही मालमत्तेची विक्री झाली आहे का? याचा अहवाल त्वरित सीआयडी कार्यालयास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. शिवाय संलग्न मालमत्तेची खरेदी, गहाण आदी व्यवहार करू नयेत, असे आवाहनही सीआयडीने केले आहे.

## जिल्ह्यात ज्वारी खरेदी केंद्र तत्काळ सुरू करा –खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात ज्वारीचे उत्पादन समाधानकारक झाले असतानाही योग्य हमीभाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. जिल्ह्यात शासन स्तरावरून ज्वारी खरेदी केंद्र तत्काळ सुरू करून शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान टाळावे, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



खा. रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नांदेड जिल्ह्यात ज्वारी हे एक प्रमुख पीक असून, यावर्षी ज्वारीचे उत्पादन समाधानकारक झाले आहे. तथापि, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनास योग्य हमीभाव मिळत नसल्यामुळे शेतकरी वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, इतका मोठा जिल्हा असतानाही शासन स्तरावरून अद्याप एकही ज्वारी खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले नाही, ही बाब अत्यंत गंभीर आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचे खा. चव्हाण यांनी स्पष्ट केले..

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी या बाबीकडे वैयक्तिक लक्ष देऊन शासन स्तरावरून नांदेड जिल्ह्यात ज्वारी खरेदी केंद्र तत्काळ सुरू करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी खा. रविंद्र चव्हाण यांनी केली आहे.

## भोकर पोलिसांची १० दिवसांत २०२ वाहनांवर दंडात्मक कारवाई

### जवळपास २ लाखांचा दंड वसूल; नियम मोडणाऱ्या ११ वाहनधारकांवर गुन्हे दाखल

**भोकर (प्रतिनिधी)–** शहरातील वाहतूक व्यवस्था शिस्तबद्ध करण्यासाठी आणि रस्ता सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चाप बसवण्यासाठी भोकर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. गेल्या दहा दिवसांत २०२ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून, तब्बल १ लाख ८८ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच गंभीर स्वरूपाचे उल्लंघन करणाऱ्या ११ वाहनधारकांवर गुन्हे (FIR) दाखल करण्यात आले आहेत.



दि. २६ एप्रिल २०२६ ते ६ मे २०२६ या कालावधीत भोकर शहरात मोटार वाहन कायद्यानुसार ही व्यापक मोहीम राबवण्यात आली. या कारवाईमुळे नियमबाह्य वाहन चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. केवळ दंडच नव्हे, तर पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम २८५ प्रमाणे ११ गुन्हे दाखल करून ही प्रकरणे पुढील कार्यवाहीसाठी न्यायालयात पाठवली आहेत.

ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी दगडू हाके आणि भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे, कल्पना राठोड, पोलीस उपनिरीक्षक राम कराड, सुरेश जाधव, दिलीप जाधव यांच्यासह भोकर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

**नियम पाळण्याचे आवाहन**

पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रत्येक वाहनधारकाने वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. रत्यावर वाहन चालवताना इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे ही सर्वांची जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कडक कायदेशीर कारवाई सुरू राहील.

पोलीस हेड कॉन्स्टेबल वंदना घुले व इतर सहकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हे गुन्हे दाखल करण्यात आले असून, या प्रकरणांचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या देखरेखीखाली सुरू आहे.

## कै. रामलू प्रतिष्ठानतर्फे पाणपोईची सुरुवात



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** येथील कै. रामलू साहेब प्रतिष्ठानच्या वतीने हेडगेवार चौक येथे पाणपोईचे नुकतेच उद्घाटन पार पडले. या पाणपोईचे उद्घाटन कुंडलवाडीच्या नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्षा नेहाताई शैलेश न्याकावार, नगराध्यक्षा प्रतिनिधी गजानन कोटलावार, उपनगराध्यक्षा प्रतिनिधी शैलेश न्याकावार, नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, प्रकाश पाटील अर्जुने, डॉ. प्रशांत सब्बनवार, रमेश इरलावार, संजय गोनेलवार, साईनाथ भातनाते, संजय भास्कर, मारोती कोटलावार, गंगाधर कोटलावार, शेख मुख्तार शेख नसीर, नगरसेविका सौ. अर्चना पोतनकर, सौ. सोनीताई राहुल सब्बनवार, नगरसेविका प्रतिनिधी भीम पोतनकर, संजय खुळगे, अजय गड्डूवार, अमरनाथ कांबळे, नरसिंमलू कोटलावर तसेच डॉ. हनमंतराव लखमपुरे, डॉ. नरेश बोधनकर, शिवा जायेवार, रमेश गड्डूवार, हरीश देशपांडे, गंगाधर दुसलवाड नागरिक व पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

## पगाराविना विकास कसा? जेजेएम-एसबीएम कर्मचाऱ्यांचा सवाल

### अनेक महिन्यांपासून वेतन थकले; राज्यभर असहकार आंदोलन, धरण्याचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)** –ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व स्वच्छता योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या जल जीवन मिशन (JJM) आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM-G) अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांवर सध्या गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. अनेक महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, पगाराविना विकास कसा साध्य होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

उपलब्ध माहितीनुसार जलजीवन मिशनमधील कर्मचाऱ्यांचे सुमारे ५ ते ६ महिने, तर स्वच्छ भारत मिशनमधील कर्मचाऱ्यांचे ३ ते ४ महिने मानधन प्रलंबित आहे. मागील ७-८ महिन्यांत केवळ एकदाच मानधन मिळाल्याचे समोर आले आहे. परिणामी घरभाडे, शिक्षण, आरोग्य व दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले असून, अनेकांना उधारीवर संसार चालवावा लागत आहे.

राज्यातील या कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळे आतापर्यंत ३८,८०५ गावे हागणदारीमुक्त अधिक तर १४,४७२ गावे हर घर जल म्हणून घोषित झाली आहेत. मात्र, या यशामागील कर्मचाऱ्यांनाच आर्थिक असुरक्षिततेला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रलंबित मानधन अदा करण्याचे आदेश दिले होते, तर राज्य मानवाधिकार आयोगाने २५ मार्च रोजी तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले होते. तरीही अंमलबजावणीत विलंब होत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीच्या म्हणण्यानुसार प्रशासकीय समन्वयाच्या अभावामुळे निधी वितरण प्रक्रियेत अडथळे येत आहेत. SN-SPRSH प्रणालीतून निधी वितरित झाल्यानंतरही प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यासाठी विलंब होत असल्याची तक्रार आहे. याचा परिणाम क्षेत्रीय कामकाज, डेटा अहवाल व जनजागृती उपक्रमांवरही होत आहे. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांनी २० एप्रिल २०२६ पासून राज्यव्यापी असहकार आंदोलन सुरू केले असून अहवाल सादरीकरण व बैठकींमध्ये सहभाग मर्यादित केला आहे. पुढील टप्प्यात प्रधान सचिव कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

प्रलंबित मानधन तत्काळ अदा करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र मानधन शिर्ष निर्माण करावे, सेवा-सुरक्षा व स्थिर वेतन व्यवस्था लागू करावे आदी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. आगामी काही दिवसांत ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

### १०० दिवस कृती आराखडा उपक्रम स्वच्छता विभागामार्फत

## पावसाळा पूर्वतयारी अंतर्गत नाले सफाईला सुरूवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड मनपाच्या स्वच्छता विभागामार्फत १०० दिवस कृती आराखडा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत पावसाळा पूर्वतयारीच्या अनुषंगाने नाले सफाईला सुरुवात करण्यात आली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेच्या सेवा सुविधामध्ये संख्यात्मक व गुणात्मक सुधारणा करणे उद्देशाने महापौर सौ. कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृह नेता ॲड. महेश कनकदंडे यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत १०० दिवस कृती आराखडा उपक्रम सुरू करण्यात आला.

या उपक्रमामधील आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत नांदेड मनपा स्वच्छता विभागाकडून पावसाळा पूर्वतयारी अंतर्गत शहरातील छोटे व मोठे नाले जेसीबी पोकलेन साह्याने कामांची सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये आयुक्त महेशकुमार डोईफोडे, उपआयुक्त नितीन गाढवे (स्वच्छता), सहायक आयुक्त (स्वच्छता) गुलाम सादिक यांचे आदेश तथा मार्गदर्शनाखाली प्रभाग क्र. ०२, ०५, ०८, ०९, १३, १७, २० मधील पावसाळा कालावधीत भरणारे तथा वाहणारे नाल्यांची स्वच्छता निरीक्षकांकडून साफसफाईचे काम सुरू आहे. सदरील नाल्यांच्या व्याप्तीप्रमाणे तथा कच्चे व पक्के नाले या प्रमाणे सदरील नाल्यांची सफाई जेसीबी पोकलेन साह्याने साफसफाई करण्याचे काम काटेकोरपणे मागील दोन आठवड्यापासून सुरु आहे.

सदरील कामावर उपआयुक्त (स्वच्छता) नितीन गाढवे, सहाय्यक आयुक्त (स्वच्छता) गुलाम सादीक हे वेळोवेळी स्थळभेटी देऊन कामाची पाहणी करीत आहेत. सदरील कामामुळे शहरातील पावसाळ्यात अतिवृष्टीमध्ये पडणारे पाणी सुरळीत वाहून जाईल व सखल भागात पाणी साचणार नाही तथा समस्या उद्‌भवणार नाहीत. तसेच या प्रभागामध्ये रस्ते डीप क्लिनिंग करण्यात येत असून, स्वच्छता निरीक्षकांमार्फत घरोघरी विलगीकृत कचरा संकलन, परिसर स्वच्छताविषयक जनजागृती करण्यात येत आहे. त ` ० ह ा शहरील नागरिकांनी देखील चांगले आरोग्य व परिसराच्या दृष्टीने आपल्या घराशेजारील मोठ्या आकाराची रिकामी जागा असल्यास तेथे पावसाचे पाणी तथा कचरा साचणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## माजी जि. प. सदस्य संग्राम हयगले शिवसेनेत

**बिलोली (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील कासराळी येथील रहिवासी व लोहगाव जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य संग्राम हयगले यांनी २७ एप्रिल २०२६ रोजी ठाणे येथील स्व. मातोश्री गंगुबाई शिंदे सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला.

हायगले हे शांत स्वभाव, कार्यतत्परता आणि लोकाभिमुख नेतृत्वासाठी ओळखले जातात. भाजपामध्ये कार्यरत असताना त्यांनी दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून येत आपली छाप पाडली होती. त्यांच्या कार्यकाळात ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, शाळांची दुरुस्ती, अंगणवाडी सुविधा आणि शेतकरी कल्याणाशी संबंधित अनेक कामे त्यांनी मार्गी लावली होती. हयगले यांच्या या पक्षप्रवेशामुळे अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## इयत्ता बारावी पुरवणी परीक्षेचे आवेदन पत्र भरण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** इयत्ता बारावीची परीक्षा फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे. इयत्ता १२ वी परीक्षेस पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच (फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ठ न झालेले) जून-जुलै २०२६ नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी, आयटीआय विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्र ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इ. १२ वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावेत, असे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी केले आहे.

शुल्क प्रकार विद्यार्थ्यांनी उच्च माध्यध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ठ न झालेले) श्रेणी सुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा, नियमित शुल्क मंगळवार, दि. ५ मे ते शुक्रवार दि. १५ मे २०२६ पर्यत आहेत. विलंब शुल्क शनिवार १६ मे ते बुधवार २० मे २०२६ असा आहे.

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत आरटीजीएस व एनईएफटीद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा, गुरुवार २१ मे २०२६, उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आरटीजीएस व एनईएफटी पावती, चलनासह प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख सोमवार २५ मे २०२६ अशी आहे.

या परीक्षेचे आवेदनपत्रे ही ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.

ऑनलाईन आवेदनपत्र भरताना फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल. श्रेणीनुसार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यासाठी जून- जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७ व जून-जुलै २०२७ अशा लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील यांची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शाल देण्यापेक्षा पुस्तक देऊन सत्कार करा -माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर

- रामतीर्थ येथे बुद्ध मूर्ती स्थापना सोहळा उत्साहात संपन्न
- खा. रवींद्र चव्हाण यांनी अभ्यासिकेसाठी दिला दहा लाखांचा निधी

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथील तक्षशीला बुद्ध विहारात ५ मे रोजी भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची स्थापना उत्साहात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांची उपस्थिती होती. तर उद्घाटक म्हणून खा. रवींद्र पाटील चव्हाण यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता प्रा. डॉ. गायकवाड यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सकाळी ९ वाजता बुद्ध मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. नंतर विहारात मूर्ती स्थापना व धम्मदेशना करण्यात आली. सायंकाळी सुप्रसिद्ध शाहीर डॉ. अनिरुद्ध वनकर यांचा शिवराय ते भीमरायांचा वादळ वारा हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.



शाल नको, पुस्तक देऊन सत्कार करा, असे आवाहन खतगावकर भास्करराव पाटील खतगावकर यांनी केले.

पुढे बोलताना माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर म्हणाले की, सत्कार सोहळ्यात शाल-श्रीफळ देण्यापेक्षा पुस्तक देऊन सत्कार करणे ही खरी ज्ञानपरंपरा आहे, असे सांगत त्यांनी शिक्षण आणि विचारसंपन्न समाजाची गरज अधोरेखित केली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे जतन करण्याचे आवाहन केले. देशातील लोकशाही टिकवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने संविधानाचे रक्षणकर्ते म्हणून काम केले पाहिजे, असे आवाहन केले.

बुद्ध मूर्ती स्थापना सोहळ्यानिमित्त दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला शिवाजी पाटील पाचपिपळीकर, माणिकराव लोहगावे, हणमतराव पाटील तोडे, बाबाराव रोखडे, संतोष पुयड, मुरळीधर देगलुरे, मोहनराव कदम, ॲड. गौतम कांबळे, हणमंत गायकवाड, ब्रम्हा कांबळे, तक्षशीला गौतम बुद्ध समितीच्या वतीने पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला परिसरातील पत्रकार बांधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# अंतर्मन



# कलियुगात कोणत्या कर्मांनी मानवाचे दु :ख होईल कमी?

## नारद पुराणातून कलियुगाची रहस्ये जाणून घ्या...

**नारद मुनी हे ब्रह्मदेवाच्या पुत्रांपैकी एक होते. त्यांच्या ज्ञानामुळे आणि बुद्धिमत्तेमुळे सर्व देव, ऋषी आणि दानव त्यांचा आदर करत असत. नारद मुनींनी इतर ऋषींशी चर्चा करून नारद पुराण रचले. हे पुराण कलियुगाबद्दल बरेच काही प्रकट करते. कलियुग कसे असेल, कलियुगात लोक कसे असतील, कलियुगात काय घडेल आणि कलियुगात व्यक्तीला आनंदी राहण्यास कोणती कर्मे मदत करू शकतात, याचे वर्णन यात आहे. याशिवाय, पुराणात जीवन आणि मृत्यू, कौटुंबिक जीवनाचे नियम आणि मृत्यूनंतरच्या जीवनाचे वर्णन आहे. नारद पुराणानुसार, जर एखाद्या व्यक्तीने विशिष्ट कर्मे केली, तर तो कलियुगातही आनंदी राहू शकते आणि सर्व अडथळे दूर होतील.**

### कलियुग आल्यावर काय होईल?

नारद पुराणानुसार, जेव्हा घोर कलियुग येईल, तेव्हा प्रामाणिक आणि थोर लोकांमध्येही दोष आढळतील. अधर्म हा लोकांचा सामान्य भाऊ बनेल आणि मानव दया, धर्म इत्यादींपासून वंचित होईल. संकटाच्या काळात गुरु, शिष्य, पुत्र, पिता, पत्नी, पती कोणीही असणार नाही. कलियुगात गुरूंचा अनादर केला जाईल. लोक पैसा कमावण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यास तयार असतील. पुराणांनुसार, कलियुगात बियाणे आणि फळे नष्ट होऊ लागतील आणि शेतकऱ्यांना त्रास होऊ शकतो. लोक आपले पोट भरण्यावर अधिक लक्ष केंद्रित करतील. त्याचबरोबर, कलियुगात मांसाहारही वाढेल. असे म्हटले जाते की कलियुगात लोकांचे आयुर्मानही कमी होईल.

### या कर्मांमुळे कलियुगाचे अडथळे होतील दूर

नारद पुराणात असे म्हटले आहे, की जेव्हा कलियुग येईल, तेव्हा जे भगवान विष्णूच्या भक्तीत मग्न राहतील, त्यांना कलियुगाच्या कोणत्याही अडथळ्यांचा सामना करावा लागणार नाही. सत्ययुगात तपश्चर्या, त्रेतायुगात ईश्वराचे ध्यान, द्वापरयुगात यज्ञ करणे आणि त्याचप्रमाणे कलियुगात केवळ दान करणे हे श्रेष्ठ मानले जाते. त्यामुळे, जे कलियुगात दानधर्म करतात त्यांना कलियुगाचा अडथळा येत नाही. नारद पुराणानुसार, जी पुण्यकर्मे सत्ययुगात दहा वर्षे, त्रेतायुगात एक वर्ष आणि द्वापरयुगात एक महिना लागतात, ती कलियुगात एका रात्रीत पूर्ण होतात. कलियुगात भगवान विष्णूच्या पूजेला आणि आराधनेला मोठे महत्त्व दिले गेले आहे. असा विश्वास आहे की, सत्ययुगात ध्यानाने, त्रेतायुगात यज्ञांनी आणि द्वापरयुगात ईश्वराच्या पूजेने मिळणारी फळे, कलियुगात केवळ भगवान विष्णूच्या नावाचा जप करून मिळवता येतात. कठोर कलियुगात, जे रात्रंदिवस भगवान विष्णूची उपासना आणि नामजप करतात, त्यांना कोणताही अडथळा येत नाही. नारद पुराणानुसार, कलियुगात निस्वार्थपणे किंवा स्वार्थाने 'नमो नारायणाय' चा जप केला पाहिजे. असे मानले जाते की कठोर कलियुगातही, जे भगवान विष्णूचे ध्यान करतात त्यांना कधीही त्रास होत नाही.

### देवाच्या या नावांचा जप केल्याने मिळते पुण्य

- नारद पुराणानुसार, जे दररोज 'हरे, केशव, गोविंद, जगन्मय आणि वासुदेव' या देवाच्या नावांचा नियमितपणे जप करतात, त्यांना अत्यंत शुभ फळे मिळतात.
- 'शिव, शङ्कर, रुद्र, ईश, नीलकंठ, त्रिलोचन' यांसारख्या भगवान शिवाच्या नावांचा जप केल्याने कलियुगातील अडथळे दूर होतात.
- 'नारदजी, महादेव, विरुपाक्ष, गङ्भाधर, मृड, अव्यय' यांसारख्या भगवान शिवाच्या नावांचा जप केल्याने मनुष्याला समाधान आणि धन्यतेची भावना येते.
- 'जनार्दन, जगन्नाथ, पीतांबरधर, अच्युत' इत्यादी भगवान विष्णूच्या नावांचा जप केल्याने मनुष्य कलियुगाच्या भीतीपासून मुक्त होतो.

### केवळ भगवान विष्णूच्या नावानेच मुक्ती शक्य

नारद पुराणात असे म्हटले आहे की, जेव्हा भयंकर कलियुग येईल, तेव्हा मनुष्यांना पुत्र, पत्नी आणि संपत्ती प्राप्त होईल, परंतु भगवान विष्णूची भक्ती दुर्मिळ होईल. जे वैदिक परंपरा आणि नियमांपासून दूर आहेत, पापकर्म करतात आणि ज्यांच्यात मानसिक शुद्धतेचा अभाव आहे. त्यांचे तारण केवळ भगवानाच्या नावानेच होऊ शकते. नारद पुराणानुसार, मनुष्याने आपल्या क्षमतेनुसार वैदिक विधी करावेत आणि ते भगवान विष्णूला समर्पित करावेत. भगवान हरीच्या आश्रयात राहावे. विष्णूला समर्पित कर्मे केवळ त्यांचे स्मरण केल्याने पूर्ण होतात. जे भगवान विष्णूचे स्मरण करतात आणि भगवान शिवाच्या नावांचा जप करतात, त्यांची कर्मपूर्ती निश्चितच होते.




# गंगा दसरा

## अचूक तारीख, स्नान अन् दानासाठी शुभ वेळ कोणती? गंगेत स्नानाचा मंत्रही जाणा...

**हिंदू धर्मात गंगा दसऱ्याला विशेष महत्त्व आहे. हा सण ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या दहाव्या दिवशी साजरा केला जातो. असे मानले जाते की याच दिवशी गंगा माता पृथ्वीवर अवतरली होती. त्यामुळे गंगा दसऱ्याच्या शुभ प्रसंगी स्नान करणे, दान करणे आणि पूजा करणे विशेष महत्त्वाचे मानले जाते. असे केल्याने मनुष्य अजाणतेपणीच्या पापांपासून मुक्ती मिळवून मोक्षप्राप्ती करू शकतो, असा विश्वास आहे. या दिवशी भक्त गंगेत स्नान करण्यासाठी हरिद्वार आणि प्रयागराजसह अनेक पवित्र स्थळांना भेट देतात. चला गंगा दसरा, त्याची शुभ वेळ आणि गंगेत स्नान करण्याच्या मंत्रांबद्दल जाणून घेऊया...**

### गंगा दसरा कधी आहे?

पंचांगानुसार, ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षाची दशमी तिथी सोमवार, २५ मे रोजी पहाटे ४:२८ वाजता सुरू होते. ही दशमी तिथी दुसऱ्या दिवशी, मंगळवार, २६ मे रोजी पहाटे ५:११ वाजेपर्यंत चालेल. त्यामुळे उदय तिथीच्या गणनेनुसार, गंगा दसरा २५ मे रोजी साजरा केला जाईल. या दिवशी शुभ मुहूर्तावर गंगा नदीत स्नान करून भगवान शिवाची पूजा करणे आणि त्यांना दान देणे याला विशेष महत्त्व आहे. असे केल्याने भक्ताच्या जीवनात सुख आणि शांती येते, असा विश्वास आहे. गंगा दसऱ्याच्या दिवशी गंगा नदीत स्नान करताना 'ओम नमः शिवायै नारायण्यै दशहरायै गङ्गायै नमः' या मंत्राचा जप केला जाऊ शकतो. पंचांग दिवाकर आणि ज्योतिषांच्या मते, जर ज्येष्ठ महिन्यात अधिक मास असेल, तर हा सण केवळ त्याच महिन्यात साजरा केला जातो, पवित्र महिन्यात नाही. 'ज्येष्ठे मलमासे सति तत्रैव दशहरा कार्या, न तु शुद्धे । दशहरासु नोत्कर्षः चतुर्व्वपि युगादिषु' शास्त्रानुसार, ज्येष्ठ महिन्यामध्ये गंगेत स्नान करणे, दान करणे आणि पूजा करणे अधिक फलदायी ठरते. या दिवशी सकाळी ९:०७ नंतर चंद्र कन्या राशीत प्रवेश करेल आणि सूर्य वृषभ राशीत राहील. परिणामी या वेळी गंगा दसऱ्याचे महत्त्व अधिक असेल.

- **ज्येष्ठ शुक्ल दशमी तिथी सोमवार, २५ मे रोजी पहाटे ४:२८ वाजता सुरू होईल.**
- **ज्येष्ठ शुक्ल दशमी तिथी मंगळवार, २६ मे रोजी पहाटे ५:११ वाजता संपेल.**
- **गंगा दसरा - २५ मे, सोमवार**



- गंगा दसरा स्नान अन् दान मुहूर्त : सोमवार, २५ मे रोजी ब्रह्म मुहूर्तावर स्नान करणे आणि दान करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत या दिवशी पहाटे ४:३० ते ५:३० ही वेळ या कार्यांसाठी सर्वोत्तम असेल. शिवाय, या शुभ सकाळच्या वेळी स्नान आणि दानदेखील करता येते.

- ब्रह्म मुहूर्तः पहाटे ४:३० ते ५:३०
- अमृत चौघडियाः पहाटे ५:२५ ते ७:०८
- शुभ चौघडियाः सकाळी ८:५१ ते १०:३४

### गंगेत स्नान करण्यासाठीचे मंत्र

पद्म पुराणात गंगेच्या महानतेचे वर्णन आहे. गंगेत स्नान करताना काही विशिष्ट मंत्रांचा जप करणे देखील अत्यंत शुभ मानले जाते. असे म्हटले जाते की असे केल्याने व्यक्ती अजाणतेपणीच्या पापांपासून मुक्ती मिळवू शकते आणि विष्णू लोकात स्थानही प्राप्त होऊ शकते. म्हणून, गंगेत स्नान करताना या मंत्रांचा जप करणे आवश्यक आहे. गंगा गंगेति यो ब्रूयाद् योजनानां शतैरपि, मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति। यत्संस्मृतिः सपदि कृन्तति दुष्कृतौघं, पापवलीं जयति योजनलक्षतोअपि। यन्नाम नाम जगदुच्चरितं पुनाति दिष्ट्या हि सा पथि दृशोर्भविताद्य गंगा। या मंत्रांचा जप गंगेत स्नान केल्यानंतर माता गंगेची पूजा करताना अत्यंत शुभ मानला जातो. द्रवीभूतं परं ब्रह्म परमानन्ददायिनी, अर्घ्यं गृहाण में गंगे पापं हर नमोस्तुते। गंगेत स्नान करताना सूर्यदेव आणि माता गंगा यांना अर्घ्य अर्पण करण्याचे विशेष महत्त्व आहे. या काळात या मंत्राचा जप करावा. असे मानले जाते की गंगेत स्नान करताना या मंत्रांचा जप केल्याने व्यक्तीच्या जीवनात सुख आणि समृद्धी येते. कारण गंगा माता ही नद्यांमध्ये सर्वोत्तम मानली जाते.

# विष योगावरील उपाय

## जीवनावरील परिणाम अन् ते कसे टाळावे याबद्दल घ्या जाणून...

**विष योग ज्या व्यक्तीच्या कुंडलीत असतो, त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत शनी आणि चंद्र एकाच घरात असतात किंवा त्यांची एकमेकांवर दृष्टी असते, तेव्हा विष योग तयार होतो. विष योगाच्या प्रभावामुळे मोठे संघर्ष निर्माण होऊ शकतात. गोष्टी बिघडू शकतात. विष योगाचे प्रभाव कमी करण्यासाठी ज्योतिषशास्त्र अनेक उपाय सुचवते. ज्योतिषी मधू प्रिया यांच्याकडून विष योगावरील उपायांबद्दल जाणून घेऊया...**

ज्योतिषी मधू प्रिया स्पष्ट करतात की, शनी आणि चंद्र हे मित्र नाहीत, त्यामुळे जेव्हा ते एकमेकांवर दृष्टी टाकतात, तेव्हा विष योग तयार होतो. जेव्हा विष योग तयार होतो, तेव्हा व्यक्तीला मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास होतो. अशा परिस्थितीत, चंद्र आणि शनीला शुभ ठेवण्यासाठी काही विशेष उपाय करणे आवश्यक आहे.

### विष योगावरील उपाय



- चंद्राला अनुकूल ठेवण्यासाठी चंद्राशी संबंधित वस्तूंचे दान करा, जसे की दूध, तांदूळ, दही इत्यादी. तुम्ही चांदीचेही दान करू शकता.
- शनीचा शुभ प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी शनीशी संबंधित वस्तूंचे दान करा किंवा तुम्ही खिचडी बनवून दान करू शकता.
- तुम्ही मजूर आणि वृद्धांसाठी चपला आणि इतर वस्तू देखील खरेदी करू शकता.
- तुम्ही सोमवार आणि शनिवारी शिव चालिसाचे पठण देखील करू शकता. पिंपळाच्या झाडाजवळ दिवा लावण्यास सुरुवात करा.
- तुमची इच्छा असल्यास, तुम्ही सोमवारी उपवास देखील करू शकता. यामुळे चंद्र देखील बलवान होतो.


### विष योगाचा प्रभाव

- जर एखाद्याच्या कुंडलीत चंद्र बलवान आणि शनी कमजोर असेल, तर विष योगाचा प्रभाव कमी होतो.
- जेव्हा विष योग तयार होतो, तेव्हा व्यक्ती असंतुष्ट राहते. मनात सतत नकारात्मक विचार येतात.
- अशा लोकांना लहानसहान अपयशही निराश करते.
- असे लोक आपला बहुतेक वेळ आपल्या शत्रूंबद्दल विचार करण्यात घालवतात. त्यांना कसे नुकसान पोहोचवायचे याचाच ते सतत विचार करत असतात.

# गुरु ग्रहाला बलवान करण्याचे मार्ग...

## सुख- समृद्धी वाढवण्यासाठी करून पहा उपाय

**गुरु ग्रहाला बलवान करण्याच्या मार्गांबद्दल ज्योतिषी सांगतात की, गुरु हा नऊ ग्रहांपैकी सर्वात मोठा ग्रह आहे. त्यामुळे कुंडलीतील आणि गोचर (संक्रमण) दरम्यानची त्याची स्थिती तितकीच महत्त्वाची ठरते. ज्यांच्या कुंडलीत गुरु बलवान असतो, त्यांची वाणी प्रभावी आणि बुद्धी तल्लख असते. त्यामुळे त्यांना यश आणि आदर दोन्ही मिळवता येतो. कमजोर गुरु त्यांची बुद्धिमत्ता आणि प्रभाव कमी करू शकतो, ज्यामुळे व्यवस्थापन कौशल्ये, आनंद आणि संपत्तीमध्ये अडचणी येतात. कमजोर गुरु वैवाहिक जीवनातही समस्या निर्माण करू शकतो आणि विवाहात अडथळा आणू शकतो. म्हणून, गुरुला बलवान करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. त्याला कसे बलवान करावे याबद्दल ज्योतिषी काय म्हणतात ते जाणून घेऊया...**




### कमजोर गुरुची लक्षणे...

जर कुंडलीत गुरु कमजोर असेल, तर व्यक्तीला आर्थिक चढ-उतारांचा सामना करावा लागू शकतो. कुंडलीतील कमजोर गुरु व्यक्तीच्या आनंदात अडथळा आणू शकतो. ज्यामुळे कठोर परिश्रम आणि प्रयत्न करूनही त्यांना अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. कमजोर गुरु व्यक्तीच्या वैवाहिक जीवनावरही परिणाम करू शकतो. याशिवाय शिक्षण क्षेत्रातही अडथळे निर्माण होऊ शकतात. यामुळे उच्च शिक्षण घेण्यात अडचणी येऊ शकतात. कमजोर गुरुच्या प्रभावामुळे आत्मविश्वासाची कमतरता देखील निर्माण होऊ शकते. परिणामी, व्यक्तीला निर्णय घेताना गोंधळ आणि अडचणींचा सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत, गुरूची स्थिती सुधारण्यासाठी काही उपाय केले जाऊ शकतात.

### गुरुला बलवान करण्याचे उपाय

- केशरी टिळा : जर तुमच्या कुंडलीत गुरुची स्थिती कमजोर असेल, तर तुम्ही एक सोपा उपाय करून पाहू शकता. नियमितपणे केशरी टिळा लावण्याचा सल्ला दिला जातो. असे मानले जाते की या उपायामुळे मानसिक शांती मिळते आणि गुरुला बलवान करण्यास मदत होते.
- हळदीच्या पाण्याने स्नान : गुरुवारी सकाळी लवकर उठून अंघोळीच्या पाण्यात थोडी हळद घालून स्नान करावे. हळद गुरुशी संबंधित मानली जाते. त्यामुळे, हा उपाय केल्याने जीवनात गुरुची अनुकूल स्थिती टिकवून ठेवण्यास आणि सकारात्मकता आणण्यास मदत होते.
- पिवळे कपडे घाला : हिंदू धर्मात, गुरुवार हा देवांचा गुरु असलेल्या गुरुला समर्पित आहे. शिवाय, गुरु पिवळ्या रंगाशी संबंधित आहे. त्यामुळे, शक्य असल्यास प्रत्येक गुरुवारी पिवळे कपडे घालावेत. या उपायामुळे जीवनात सुख आणि समृद्धी वाढते. शिवाय, गुरुची स्थिती सुधारते.
- केळीचे झाड लावा : ज्योतिष तज्ज्ञांच्या मते, जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत गुरुचा प्रभाव शुभ नसेल आणि त्याची स्थिती कमजोर असेल, तर शुक्ल पक्षात एक सोपा उपाय केला जाऊ शकतो. यासाठी शुक्ल पक्षात शुभ दिवशी आणि शुभ मुहूर्तावर केळीचे झाड लावावे. असे केल्याने शुभ परिणाम मिळू शकतात.
- हळद आणि दुधाचा उपाय : जर कुंडलीत गुरु आणि चंद्र एकत्र असतील, तर गजकेसरी योग तयार होतो. जेव्हा हा शुभ योग तयार होतो, तेव्हा तुम्ही गुरुवारी शिव मंदिरात कच्ची हळद आणि कच्चे दूध अर्पण करू शकता. असे केल्याने त्या व्यक्तीच्या जीवनात सुख आणि समृद्धी सुनिश्चित होईल आणि त्यांचे भाग्य वाढेल.



- पुष्कराज धारण करा : जेव्हा गुरु ग्रह कमजोर स्थितीत असतो, तेव्हा पुष्कराज धारण करणे शुभ मानले जाते. तथापि असे करण्यापूर्वी तुम्ही तुमच्या कुंडलीतील गुरुच्या स्थितीबद्दल एका कुशल ज्योतिषाचा सल्ला घ्यावा. त्यांचा सल्ला घेतल्यानंतरच योग्य रत्न धारण करणे उचित मानले जाते. याव्यतिरिक्त गुरुच्या शुभतेसाठी, गुरुवारी मांसाहार टाळावा.

# सायबर सुरक्षेसाठी कठोर कायदे, आधुनिक तपास यंत्रणा आणि जनजागृतीवर भर -प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

**मुंबई (प्रतिनिधी)** – डिजिटल व्यवहारांचा झपाट्याने वाढणारा वापर आणि त्यासोबत वाढणाऱ्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेसाठी आवश्यक धोरणात्मक बदल, कठोर नियम आणि व्यापक जनजागृतीवर भर देण्यात येत असल्याचे माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी सांगितले. सायबर गुन्हेगार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लक्ष्य करत असून या गुन्हेगारीचे स्वरूप आता पूर्णपणे संघटित आणि 'कॉर्पोरेट' पद्धतीचे बनल्याने अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली.

सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजित 'टेक वारी २.० महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' अंतर्गत 'इव्हॉल्विंग लँडस्केप इन सायबर सिक्युरिटी थ्रेट्स, चॅलेंजेस अँड ऑपर्च्युनिटीज' या विषयावरील सत्रात ते बोलत होते. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, डिजिटल व्यवहार दिवसेंदिवस वाढत असताना केवळ तांत्रिक सुरक्षा उपाय पुरेसे राहिलेले नाहीत. सुरक्षित व्यवहार पद्धतींचा अवलंब आणि नागरिकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची बाब आहे. सायबर गुन्हेगार सातत्याने नव्या तंत्रांचा वापर करत असल्याने कायद्यांमध्ये आवश्यक बदल करून अधिक कडक नियम लागू करणे गरजेचे ठरत आहे. त्याचबरोबर तपास यंत्रणांना आधुनिक साधने आणि विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे. सायबर फसवणुकीमागे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि संघटित आर्थिक जाळे कार्यरत असल्याचे सांगताना त्यांनी या प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. फसवणूक झाल्यानंतर काही मिनिटांतच रक्कम विविध खात्यांत विभागली जाते. त्यासाठी 'म्यूल अकाउंट्स'चा वापर केला जातो. त्यानंतर हे पैसे वेगवेगळ्या व्यवहारांतून पुढे पाठवले जाऊन अखेरीस क्रिप्टोकरन्सीत रूपांतरित केले जातात आणि परदेशात पाठवले जातात.

'हब बिलिंग' पद्धतीने मोठी रक्कम लहान व्यवहारांमध्ये विभागल्यामुळे पैशांचा मागोवा घेणे तपास यंत्रणांसाठी अत्यंत कठीण बनते. या संपूर्ण प्रक्रियेत ठरावीक वेळेत व्यवहार पूर्ण करण्यासाठी 'सर्व्हिस लेव्हल'नुसार नेटवर्क नियंत्रित केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉलरशी निगडित स्टेबल कॉइन्स, विशेषतः यूएसडीटीसारख्या माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत असल्याने सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान अधिक गंभीर बनले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशात 'डिजिटल अरेस्ट'सारख्या नव्या प्रकारच्या फसवणुकींनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले असल्याचेही त्यांनी सांगितले. बनावट फोन किंवा व्हिडिओ कॉलद्वारे स्वतः ला पोलीस, सीबीआय किंवा अन्य सरकारी अधिकारी म्हणून भासवले जाते आणि नागरिकांना मानसिक दबावाखाली ठेवून लाखो रुपयांची फसवणूक केली जाते. सायबर गुन्हेगार सोशल मीडियावरील वैयक्तिक माहितीचा वापर करून 'सोशल इंजिनिअरिंग'च्या माध्यमातून नागरिकांना जाळ्यात ओढतात. बनावट संकेतस्थळे, फेक ॲप्स, डीपफेक व्हिडिओ आणि व्हॉईस इम्पर्सनेशनचा वापर वाढत असल्याने नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

म्यानमार, लाओस आणि कंबोडिया येथून विविध भाषांमध्ये भारतीय नागरिकांना लक्ष्य केले जात असल्याचे सांगून ते म्हणाले की, या आंतरराष्ट्रीय जाळ्यांमुळे सायबर गुन्ह्यांचा तपास अधिक गुंतागुंतीचा होत असून क्रिप्टोकरन्सीद्वारे पैसा देशाबाहेर पाठवला जात असल्याने तपास प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सायबर फसवणुकीपासून बचावासाठी नागरिकांनी अनोळखी कॉल, लिंक आणि संशयास्पद संदेशांपासून दूर राहावे, वैयक्तिक माहिती मर्यादित प्रमाणातच शेअर करावी आणि कोणतीही फसवणूक लक्षात येताच तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन ब्रिजेश सिंह यांनी केले.

# सुनेत्रा पवार यांच्या जागी भुजबळ राज्यसभेवर?

## येवल्याची सूत्रे समीर भुजबळांकडे जाण्याची चर्चा



**नाशिक (प्रतिनिधी)** – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आता खासदारकीचा राजीनामा देण्याचा निर्णय असून, घेतला त्यांच्या जागी कोण, याची पक्षात चर्चा असताना नाशिकमध्ये मात्र अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची राज्यसभेवर वर्णी लागण्याची चर्चा सुरू आहे. असे झाल्यास येवला मतदारसंघाची सुत्रे सांभाळण्याची माजी खासदार समीर भुजबळ यांची तयारी असून, त्यामुळेच गेल्या वर्षभरापासून ते या मतदारसंघात तळ ठोकून असल्याचे दिसते आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळीच छगन भुजबळ यांना भाजपचे नेते अमित शाह यांनी निवडणूक लढवण्यास सांगितले होते, असा दावा भुजबळ यांनी केला होता. त्यांची स्वतःदेखील तशी इच्छा होती तसेच तयारीदेखील होती. मात्र, राज्याचे राजकारण तसेच त्यावेळी राज्यात पेटलेला मराठा ओबीसी वाद यामुळे राज्यस्तरावर निर्णय होत नव्हता. त्यामुळे अखेरीस छगन भुजबळ यांनीच विलंबामुळे निवडणूक लढवणार नसल्याचे सांगितले होते. दरम्यान, मंत्रिमंडळात समाविष्ट झाल्यानंतर मध्यंतरी भुजबळ यांची प्रकृती बिघडल्यानंतर भुजबळ यांचे पुतणे, माजी खासदार समीर भुजबळ हे येवल्याची सुत्रे सांभाळत होते. येवला नगरपालिकेची निवडणूकदेखील त्यांच्या नेतृत्वाखालीच लढवण्यात आली, त्यात यशही मिळाले.

छगन भुजबळ यांची लोकसभा निवडणुकीच्या वेळी संधी हुकली असली तरी मध्यंतरी राज्यसभेसाठी नाव चर्चेत होते. आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागेवर पुन्हा एकदा छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळीच भाजप नेते अमित शाह हे भुजबळ यांना अनुकूल असल्याने आता ती संधी मिळाल्यास भाजपकडूनदेखील पाठबळ मिळण्याची शक्यता आहे, असेही राजकारणातील काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# पशुसंवर्धन सेवेतील ३१०३ पदांसाठी ११ जूनला परीक्षा

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी या पदांच्या भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट 'अ'च्या २ हजार ७९५ आणि सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन गट 'अ'च्या ३०८ पदांसाठी संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही परीक्षा ११ जून २०२६ रोजी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे होणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले असून संबंधित उमेदवारांची परीक्षा सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत होणार असल्याचे नमूद केले आहे. परीक्षेतील गुणांच्या आधारे स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून त्यानंतर पुढील निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

राज्यातील पशुसंवर्धन विभागात मोठ्या प्रमाणावर अधिकारी रिक्त असल्याने पशुवैद्यकीय सेवा, पशुधन आरोग्य तपासणी, लसीकरण आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

या निर्णयाबाबत आनंद व्यक्त करताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, खूप दिवस झाले आपण ज्या अत्यंत आनंदाच्या बातमीची प्रतीक्षा करत आहात, ती बातमी तुम्हा सर्वांना देण्यासाठी मला आनंद होत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी गट 'अ' या पदासाठी २७९५ तर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट 'अ' या पदासाठी ३०८ जागांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय झालेला आहे. ११ जून २०२६ रोजी ही परीक्षा आहे. एवढे सर्व अधिकारी पशुसंवर्धन खात्यात रुजू झाल्यानंतर विभागाच्या कामाला मोठा वेग मिळेल. ग्रामीण भागातील लोकांच्या आणि त्यांच्या पशुधनाची अधिक चांगली काळजी घेणे शक्य होईल. या भरतीमुळे राज्यातील पशुवैद्यकीय यंत्रणेला मोठे बळ मिळणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करून या परीक्षेला बसणाऱ्या सर्व परीक्षार्थींना मंत्री पंकजा मुंडे यांनी शुभेच्छा दिल्या.

# भारत-व्हिएतनाम संबंध अधिक दृढ करण्यासाठी महाराष्ट्र कटिबद्ध – मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र विश्वासार्ह भागीदार म्हणून कार्य करण्यास सज्ज आहे. व्हिएतनाम सोबत सांस्कृतिक, आर्थिक आणि परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्या एक दिवसीय मुंबई भेटीदरम्यान आयोजित इंडिया-व्हिएतनाम बिझनेस फोरमला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले. यावेळी त्यांनी व्हिएतनामच्या उद्योजकांना गुंतवणुकीसाठी राज्यात येण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत आणि व्हिएतनाम भागीदारी अधिक दृढ होऊन 'एन्हान्स्ड कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रटेजिक पार्टनरशिप' नव्या स्तरावर नेल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील बौद्ध धर्माचा समृद्ध वारसा सांगताना मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारुन




त्याला आधुनिक काळात मिळवून दिलेल्या अधिष्ठानाचा परिचय दिला. तसेच युनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेली अजिंठा आणि वेरुळ येथील बौद्ध आणि जैन लेणी येथे व्हिएतनामच्या गुंतवणुकदारांचे स्वागत केले. छत्रपती संभाजीनगर आणि हो चि मिन्ह सिटी यांच्यात थेट हवाई सेवा सुरू करण्यासह स्वतंत्र बौद्ध पर्यटन सर्किट विकसित करण्याचा प्रस्ताव त्यांनी यावेळी मांडला.

मुंबई आणि हो चि मिन्ह मध्ये साधर्म्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही शहरांमध्ये नुकत्याच झालेल्या कराराचे स्वागत केले. तसेच व्हिएतनाम कंपनी विनग्रूपच्या महाराष्ट्रातील ६.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या प्रस्तावित गुंतवणुकीच्या कराराचे स्वागत करताना हा दक्षिण पूर्व आशियातून झालेला सर्वात मोठा करार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर, गडचिरोली आदी शहरांमध्ये असलेल्या औद्योगिक संधींबद्दल माहिती देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिएतनामच्या उद्योजकांना उद्योग, ऊर्जा, औषधनिर्माण, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन अशा विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. मुंबई आणि पुणे येथील औषधनिर्माण क्षेत्र जागतिक दर्जाचे असून व्हिएतनामला परवडणारी जेनेरिक औषधे आणि लसींचा विश्वासार्ह पुरवठा करण्याची क्षमता राज्यात असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र-व्हिएतनाम व्यावसायिक परिषद दरवर्षी मुंबई आणि हो चि मिन्ह सिटी येथे आळीपाळीने आयोजित करण्याचाही प्रस्ताव मुख्यमंत्री यांनी मांडला. व्हिएतनामच्या प्रतिनिधींच्या मुंबईतील पहिल्या भेटीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भेटीसाठी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## प्रमाणपत्र हरवले

माझे दिगांबर ग्यानोबा निलावार रा. बोळका ता. कंधार जि.नांदेड या नावाचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र बसस्टँड ते आयटीआय ऑटो प्रवास करताना हरवले आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- दिगांबर ग्यानोबा निलावार
रा. विजय नगर नांदेड मो.नं. ९८९०६८५६६४

## Change In Name

My old Name is **PATHAN MAHEMUDALI KHAN** which now I am changing as new Name **PATHAN MAHEMOODALI KHAN**. Henceforth, My all correspondence will be done As per my new Name. Please consider the same.

**: Address :**
**MAHEMOODALI KHAN**.
281, At.Post. Tamsa
Tq. Hadgaon Dist. Nanded

## Change In Name

My old Name is **FARZANA BEGUM PATHAN** which now I am changing as new Name **FARZANA BEGUM BASHIR KHAN PATHAN**. Henceforth, My all correspondence will be done As per my new Name. Please consider the same.

**: Address :**
**R/O 1-1-635/5, SHRAVASTI NAGAR**
**NANDED - 431602**

## जाहिर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड मधील प्लॉट क्र. ७२ हा मयत प्रेमला सूर्यकांत व्यवहारे यांचा असून, त्यांना वारसदार म्हणून दोन मुली आहेत. त्यांचेकडे रितसर वारसा हक्क प्रमाणपत्र आहे. सदरील प्लॉटची चतुःसीमा अशी-

पूर्वेस-प्लॉट क्र. ७१, पश्चिमेस प्लॉट क्र. ७३
उत्तरेस-रस्ता, दक्षिणेस प्लॉट क्र. ४७ आहे.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, प्लॉट क्र. ७२ हा शैलेश पंडित माणिकवार व कल्पना शरद केशटवार यांच्या नावे करण्याचा प्रस्ताव सदरील संस्थेकडे आला आहे. तेव्हा या प्लॉट प्रकरणी कोणाचा हरकत असल्यास संबंधितांनी लेखी आक्षेप उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेडचे अध्यक्ष किंवा सचिव यांचेकडे पुराव्यासह १५ दिवसांच्या आत तक्रार नोंदवावी. या कालावधीत आक्षेप आला नाही तर कोणाचा आक्षेप अथवा हरकत नाही असे गृहीत धरून सदरील प्लॉट क्र. ७२ हा सामायिकरित्या शैलता पंडित माणिकवार व कल्पना शरद केशटवार यांच्या नावे हस्तांतर करण्यात येईल असे जाहीर करण्यात येत आहे. करिता जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

जाहीर प्रगटन देणार
अध्यक्ष/सचिव
उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी
गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड
तथा लक्ष्मी सदन, कोसबतवार कॉम्पलेक्स शिवाजीनगर, नांदेड

## जाहिर प्रगटन

यादृवारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार पंचफुला चिमनाजी मेटकर वय ३८ रा. वडरगल्ली, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड ता. जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे मुलीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव भाग्यश्री चिमनाजी मेटकर वय १७ रा. वडरगल्ली, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड ता. जि. नांदेड या सदर व्यक्तीचा राहते घर राहते घर वडरगल्ली, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २०.०३.२००९ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २०.०३.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक २४.०४.२०२६
स्थळ - नांदेड

**तहसिलदार नांदेड करिता**

## जिजामाता सेवाभावी संस्था सिंधी ता. उमरी जि. नांदेड

### जाहिर प्रगटन

जिजामाता सेवाभावी संस्था सिंधी ता. उमरी जि. नांदेड नोंदणी क्र. एफ -५३२३ (नांदेड) या संस्थेची जमीन मौजे उमरी ता. उमरी जि. नांदेड येथील गट नं. ३८/२ मधील क्षेत्रफळ ५० आर. जमीन विक्री करावयाची आहे. जमिनीची चतुःसिमा पुर्वेला :- जगदीश कदम, पश्चिमेस - हबीब खान भोकर, दक्षिणेस - रेल्वेपटरी, उत्तरेस :- जगदीश कदम, त्यासाठी टेंडर मागविण्यात येत आहे.

सदर जाहीर प्रगटण प्रसिध्द झाल्यानंतर पाच दिवसात संस्थेकडे इच्छुक खरेदीदारांनी टेंडर भक्षण देण्यात यावे. सदर खरेदीखत मा. धर्मादाय सहआयुक्त नांदेड यांच्या आदेशास अधिन राहुन करण्यात येत आहे. करिता जाहीर प्रगटण देत आहे.

**सचिव**
**जिजामाता सेवाभावी संस्था**
**सिंधी ता. उमरी जि. नांदेड**

ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ-੪੩੧੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ

**Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431601 (Maharashtra) -India**

Ph. No. 02462-234813, 241266, 243559, Fax No. 02462-234812
E-Mail-Contact@hazursahib.com Visit us at : http:www.hazursahib.com.

No...329/26-27 **Tender Notice** Date...7/5/26...

Sealed Tender Invited from Eligible and Authorised Distributors for supply of Material for Ceiling Work like PVC, armstrong , Gypsum as well as fluted Panel for Departmental Work as Follows.

Item No.1) Providing and Fixing Fluted Panel of size 12"x10'-0" size depends on as per design ( Thickness Range from 8mm to 25mm) False Celling /wall partition In cludes Frame Work of high Quality Adhesive , Clips screws and groove joints to ensure a seamless finish Includes cutting wastage and scaffolding Material Lifting as per Desgin and site requirement etc.complete.

Item No.2) Providing and Fixing Armstrong Board (size 2'-0"x 2'-0"x7mm) False Ceiling straightened work must be finished a true horizontal level, complete in all respects including scaffolding as per Desgin and site requirement etc.complete.

Item No.3) Providing and Fixing Gypsum Board ( size 4'-0"x 6'-0") thicknes 12mm, False Celling Galvanized iron support strainghtened work of High Quality must be fin ished a true horizontal level, Complete in all respects including scaffoing as per Design and site requirement etc complete.

Item No.4) Providing and Fixing P.V.C. Panel of size 12"-0"x10'-0" size depends on as per design ( Thickness 7mm to 10mm ) False Ceiling / Wall paritition including Galvanised Iron Steel support Frame Work of high quality adhisive,Clips screw and groove joint to ensure a seanless finish includes cutting westare and scaffolder as per Design and site requirement etc complete per sqft / sqm.

- The negotiated rate will remain the same for all the work for 1 Year.

Last date of submission of quotation Dt. 14-05-2026 up to 5.00 PM under signed during Office hours in favour of Superintendent Gurudwara Sachkhand Board,Nanded for any clarifications or assistance, Please Contact Superintendent Gurudwara Sachkhand Board,Nanded and Engineering Section or through Email : contact@hazursahib.com.

The authority reserve the right to accept reject any Tender Quotation without as signing any reason.

Superintendent,
Gurudwara Sachkhand Board ,Nanded

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# किनवट बाजार समिती सभापती, सचिवाच्या संगनमतातून दीड कोटींचा अपहार?

## संचालकांची वरिष्ठांकडे तक्रार

**किनवट (प्रतिनिधी)** – किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व सचिवाच्या संगनमतातून बाजार समितीच्या जवळपास दीड कोटी रकमेचा बँकेतील 'एफ डी' मोडून अपहार केल्याची तक्रार उपसभापतींसह १६ संचालकांनी सहायक निबंधकांकडे केली आहे.

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यापूर्वीच्या संचालक मंडळाने बाजार समितीच्या मालकीची शेतजमीन विकली होती. या व्यवहारातून मिळालेली रक्कम ॲक्सिस बँकेच्या किनवट शाखेत मुदत ठेव (फिक्स डिपॉझिट) करण्यात आली होती. त्यानंतर बाजार समितीची सार्वत्रिक निवडणूक होवून नवीन पदाधिकारी सत्तेत आले. बाजार समितीची उर्वरित जमीन विकण्याचा घाट काही संचालकांकडून सुरू होता. तथापि, याबाबीची सर्वत्र चर्चा झाल्याने संबंधितांचा तो 'डाव' उधळला गेला. सद्यस्थितीत बाजार समितीत आर्थिक डबघाई आहे. कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा नियमित होत नाही. बाजार समितीमार्फत परिसरातील शेतकऱ्यांनी नाफेडला सोयाबीन विकले होते. 'चतुर' सचिव व इतरांनी यातही संगनमत करून शेतकऱ्यांचा चांगला माल बाजारात विकून खासगी व्यापाऱ्यांचा खराब माल नाफेडच्या माथी मारला. जवळपास १२ क्विंटल सोयाबीन विक्रीचे पैसे शेतकऱ्यांना नाफेडमार्फतच मिळायला हवे होते. परंतु, बाजार समितीने शेतकऱ्यांचे पैसे समितीकडे वळविले. पैशासाठी तगादा, तक्रारी केल्यानंतर संबंधितांनी शेतकऱ्यांना पैसे अदा केले. ही बाब ताजी असतानाच विद्यमान सभापती गजानन मुंडे व सचिव रवी राठोड यांनी संगनमताने बाजार समितीचे ॲक्सिस बँकेतील एफडी मोडून कॅनरा बँकेमार्फत रक्कम उचल करून अपहार केल्याची तक्रार उपसभापती, संचालकांनी केली आहे. तक्रारीत किती रकमेचा अपहार केला याचा उल्लेख नसला, तरी अंदाजे १ कोटी ६० लाखांची रक्कम हडपण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांच्यासह



सहायक निबंधक, नांदेड व किनवट तसेच आ. भीमराव केराम, पोलीस निरीक्षक किनवट यांना दिलेल्या तक्रार अर्जावर उपसभापती राहूल नाईक यांच्यासह संचालक सोपानराव केंद्रे, श्रीराम कांदे, सुनील घुगे, बालाजी बामणे, प्रल्हाद सातव, प्रेमसिंग साबळे, कैलास बिज्जमवार, विद्या दासरवार, कुसुम मुंडे, अ. सत्तार, अनसूया पेंदोर, राजू सुरोशे, प्रेमसिंग जाधव, शेख हैदर शेख मुसा व नवीन राठोड यांच्या सह्या आहेत. यासंदर्भात सभापती गजानन मुंडे व सचिव रवी राठोड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता दोघेही उपलब्ध होऊ शकले नाहीत.

### बाजार समिती गैरव्यवहाराची चौकशी करा - आ. केराम

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी बाजार समितीच्या सभापती, सचिवाविरुद्ध दिलेल्या तक्रारीची शहानिशा करून रितसर चौकशी व्हावी, खरोखरच बाजार समितीची एफडी तोडून रक्कम काढण्यात आली असेल तर ती रक्कम परत बँकेत जमा व्हावी, अशी प्रतिक्रिया आ. भीमराव केराम यांनी दिली आहे.

# नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेत ४९ गुन्ह्यांत ६३ जणांविरुद्ध कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– दिनांक १ ते ३१ मेदरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या सहाव्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, गुटखा संबंधाने ४ गुन्हे दाखल करून ७ इसमांकडून १६ लाख १४ हजार २१९ रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा वर्षेपर्यंत कैद व द्रव्य दंडाची शिक्षा आहे. त्याचप्रमाणे, दिवसभरात मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण २४ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत १४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ४४ हजार २१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर अवैध दारू विक्री करणाऱ्या २५ आरोपींविरुद्ध २५ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ३२ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच, शस्त्र अधिनियमान्वये २ कारवाया करण्यात आल्या असून, त्यात एक अग्निशस्त्र व २ काडतूस जप्त करण्यात आले आहे. कोटपा अन्वये ५, तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ४९ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून ३२ लाख ४३ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाईत नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर येथील अधिकारी व अंमलदारांनी भाग घेतला. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर हेल्पलाईनवर नागरिकांनी विश्वास दर्शविला आहे. परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सदर हेल्पलाइनची मोठी मदत होत असल्याचे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

# मनपाकडून थकबाकीवरील शास्तीत ८० टक्के सुट

**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगरपालिकेच्या साल सन २०२५-२६ मधील मालमत्ता कर थकबाकीवरील शास्तीत ८० टक्के सुट देण्याची घोषणा पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केली आहे. ही सुट दिनांक ९ मे २०२६ रोजी आयोजित लोक अदालतीच्या एका दिवसासाठी असणार आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर कर थकीत असलेल्या मालमत्ताधारकांना याचा लाभ होणार आहे.

नांदेड महानगरपालिकेने साल सन २०२६-२७ मध्ये १०० टक्के मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट ठेवले असून, त्या अनुषंगाने वसुलीस सुरुवात करण्यात आली आहे. याचाच भाग म्हणून दि. ९ रोजी लोकअदालीचे आयोजन करण्यात आले असून, महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांना लाभ प्राप्त व्हावा व थकीत कराच्या वसुलीस चालना देण्याच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ४१ व ५१ मधील तरतुदीनुसार मनपा आयुक्तांना असलेल्या प्राप्त अधिकारानुसार आयोजित लोकअदालतीलमध्ये जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्ता कराचा थकबाकीसह साल सन २०२६-२७ चा पूर्ण कराचा भरणा करतील त्यांना मालमत्ता थकबाकीवरील शास्तीमध्ये लोकअदालतीच्या एका दिवसासाठी भरघोस अशी ८० टक्के सुट देण्यात येणार आहे.

तरी महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी या एका दिवसासाठी असलेल्या योजनेचा लाभ घेऊन दि. ९ रोजी आयोजित लोकअदालतीमध्ये आपल्या थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा. तसेच मनपाकडून होणाऱ्या जप्ती, नळबंद, ड्रेनेज बंद, लिलाव इत्यादी अप्रिय घटना टाळून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार यांनी केले आहे.

# साप चावल्याने शेतकऱ्याचा मृत्यू



**किनवट (प्रतिनिधी)** – शिवारातील पाण्याची मोटार सुरू करीत असताना विषारी साप चावल्याने एका ३५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील पार्डी शिवारात गुरुवार, दि. ७ सकाळी घडली.

पार्डी येथील राम इजारे हा युवा शेतकरी रोजच्याप्रमाणे गुरुवारी सकाळी शिवारात गेला होता. पिकाला पाणी देण्यासाठी शेतातील विद्युत पंप सुरू करीत असताना अचानक त्यांच्या पायाला विषारी सापाने दंश केला. साप चावल्यानंतर त्यांची प्रकृती झपाट्याने खालावू लागल्याने कुटुंबीय व ग्रामस्थांनी त्यांना तातडीने गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, परिस्थिती गंभीर होत असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना आदिलाबाद येथे हलविण्याचा सल्ला दिला. आदिलाबाद येथे उपचार सुरू असतानाच राम इजारे याचा मृत्यू झाला. तरुण व कष्टाळू शेतकऱ्याच्या अचानक झालेल्या निधनाने संपूर्ण परिसरात शोक व्यक्त होत आहे. राम इजारे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील असा परिवार आहे.


# 'एल-निनो'च्या पार्श्वभूमीवर विशेष जिल्हा चारा सुरक्षा आराखडा

**नांदेड (प्रतिनिधी)** –यंदाच्या मान्सूनवर 'एल-निनो'चा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केल्याने संभाव्य चारा टंचाई टाळण्यासाठी नांदेड जिल्हा प्रशासन आणि पशुसंवर्धन विभाग सतर्क झाले आहे. जिल्ह्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत विशेष जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्यात येणार आहे. पालकमंत्री अतुल सावे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या निर्देशानुसार हा आराखडा तयार करण्यात येत आहे. जिल्ह्यातील पशुधनाची संख्या लक्षात घेऊन चाऱ्याची उपलब्धता कायम राहावी यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

आराखड्यानुसार धरणाच्या गाळपेरा क्षेत्रात तसेच नदीकाठच्या जमिनींवर विशेष चारा लागवड मोहीम राबविण्यात येणार आहे. टंचाईच्या काळात चाऱ्याची उपलब्धता राहावी यासाठी मुरघास प्रकल्पांना गती दिली जाणार असून, भविष्यात चारा छावण्यांची वेळ येऊ नये यासाठी चारा साठवणुकीचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच चारा साक्षरता अभियान राबवून पशुपालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

पशुपालकांनी कडबा कुट्टी यंत्राचा वापर करून चाऱ्याची बचत व योग्य व्यवस्थापन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा २ अंतर्गत दुग्ध उत्पादक पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर सुधारित वैरण बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहे. बाहेरील जिल्ह्यात चारा वाहतुकीस बंदी करण्यात येणार आहे.

राज्यात सध्या हिरव्या चाऱ्याची ४३.९८ टक्के आणि सुक्या चाऱ्याची २५.१२ टक्के तूट असल्याचे नमूद करण्यात आले आहे. एल-निनोमुळे पावसात घट झाल्यास ही तूट आणखी वाढण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना सुरू केल्या आहेत. जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत पहिल्या टप्प्यात १०० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, चारा बियाणे खरेदीसाठी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) अकोला यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. बियाणे वेळेत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजनही करण्यात आले आहे.




# घरफोडी करणाऱ्या चोरट्यास अटक; पाच लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात घरफोड्या करून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या अट्टल चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकाने शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून पाठलाग करून अटक केली. चोरट्यांकडून सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह पाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मुद्देमालासह चोरट्यांना विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गुन्हा क्रमांक १७१/२०२६ व १६३/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (४) अन्वये गुन्हा नोंद विमानतळ पोलीस ठाण्यात करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांनी केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली या पथकाने ही मोहीम यशस्वी राबवली. पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्यासह पोलीस अंमलदार रवींद्र बामणे, चंद्रकांत स्वामी, शेख अरशद, रितेश कुलथे, अनिल बिरादार, सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे व सागर राठोड यांनी सहभाग घेतला होता. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शेख नदिम शेख महेबूब (वय २२, रा. मालेगाव खेडी), शेख रेहान उर्फ भोंडी शेख अय्यूब (वय १९, रा. मखदुम नगर, नांदेड) यांचा समावेश असून शेख गौस शेख माजिद (वय २२, रा. कामठा, नांदेड) हा फरार आहे.

# जीएसटी ट्रिब्युनल अपील विषयावर आज चर्चासत्र

**नांदेड (प्रतिनिधी)** – टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन, नांदेड यांच्या वतीने जीएसटी ट्रिब्युनल अपील या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. ८ मे रोजी सकाळी १०.३० वाजता शिवाजीनगर येथील हॉटेल विसावा पॅलेस येथे आयोजित करण्यात आला आहे.

या चर्चासत्रात छत्रपती संभाजीनगर येथील प्रख्यात कर सल्लागार ॲड. (सीए) आदित्य नावांदर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून जीएसटी अपीलेट ट्रिब्युनल संदर्भातील विविध महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत.

विशेषतः १ एप्रिल २०२६ पूर्वी प्राप्त झालेल्या आदेशांविरुद्ध अपील दाखल करण्याची अंतिम मुदत ३० जून २०२६ असून, १ एप्रिल २०२६ नंतर प्राप्त आदेशांसाठी आदेश प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत FORM² GST PL-05 मध्ये अपील दाखल करणे आवश्यक असल्याची माहिती या चर्चासत्रात देण्यात येणार आहे. कर सल्लागार, व्यापारी व संबंधित क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी हे चर्चासत्र अत्यंत उपयुक्त ठरणार असून, सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी नोंदणी शुल्क ३०० रुपये ठेवण्यात आले आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष गंगाबिशन कांकर, सचिव सीए सागर सोमानी तसेच समस्त कार्यकारिणी यांनी दिली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com